**सुविचार**

अगर आपको देखना ही है तो हर एक की विशेषतायें देखिये । अगर आपको कुछ छोडना ही है तो अपनी कमजोरियाँ छोडिये।

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक

# यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/शनिवार दि. १४ सप्टेंबर २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१९१ ✦पृष्ठे८✦किंमत १ रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

## राहुल गांधींना जिवे मारण्याची धमकी

नागपूर : लोकसभेतील विरोधी पक्षनेते खा. राहुल गांधी यांना भाजपाचे माजी आमदार तरविंदरसिंग मारवा यांच्याकडून जिवे मारण्याची धमकी देण्यात आल्याचा निषेध करीत नागपूर शहर काँग्रेसने शुक्रवारी व्हेरायटी चौकात तीव्र आंदोलन करण्यात आले. यावेळी मारवा यांना अटक करण्याची मागणी करीत संतप्त काँग्रेस कार्यकर्त्यांनी रस्ता रोको केला. यावेळी शर अध्यक्ष आ. विकास ठाकरे, आ. ॲड. अभिजित वंजारी यांच्यासह पदाधिका-यांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

शहर अध्यक्ष आ. विकास ठाकरे यांच्या नेतृत्त्वात काँग्रेस कार्यकर्त्यांनी व्हेरायटी चौकातील महात्मा गांधी यांच्या पुतळ्यासमोर आंदोलन केले. यावेळी आ. विकास ठाकरे यांनी भाजप नेत्यांवर नेम साधला. भारत जोडो यात्रेच्या माध्यमातून देशभरात प्रेमाचा संदेश देणारे काँग्रेस नेते राहुल गांधी यांना जीवे मारण्याची धमकी देऊन भाजपची खरी मानसिकता समोर आली आहे. राहुल गांधी यांच्या केसालाही धक्का लागला तर देशभरातील काँग्रेस कार्यकर्ते रस्त्यावर उतरतील, असा **(पान ७ वर)**

अंदमान-निकोबारच्या राजधानी

## पोर्ट ब्लेयर ऐवजी आता विजयपुरम

नवी दिल्ली : केंद्रातील एनडीए म्हणजेच मोदी सरकारने केंद्रशासित प्रदेश असलेल्या अंदमान-निकोबारची राजधानी पोर्ट ब्लेयरचं नामांतर करण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आपल्या ट्विटर अकाऊंटवरुन या नामांतरणासंदर्भात घोषणा केली आहे. आता, राजधानी पोर्ट ब्लेयरचे नाव श्री विजयपुरम करण्यात येत असल्याचं अमित शाह यांनी म्हटलं आहे. पोर्ट ब्लेयर एक गुलामगिरीचे प्रतिक होते. त्यामुळे, केंद्रशासित प्रदेशाची राजधानी असलेल्या पोर्ट ब्लेयरचे नाव बदलण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. गृहमंत्री अमित शाह यांनी आपल्या ट्विटर अकाऊंटवरुन यासंदर्भात माहिती दिली आहे. गुलामगिरीच्या खूणा संपविण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केलेल्या संकल्पातून प्रेरीत होऊन आज गृह मंत्रालयाने पोर्ट ब्लेयरचे नामांतर करण्याचा निर्णय घेतला आहे.

अमित शाह यांनी ट्विटरवरुन जाहीर केल्याप्रमाणे, अंदमान-निकोबारची राजधानी असलेल्याा पोर्ट ब्लेयरचे नाव आता श्री विजयपुरम होत असल्याचे त्यांनी जाहीर केले. तसेच, श्री विजयपुरम हे नाव आपल्या स्वाधीनताच्या संघर्षाला आणि त्यामध्ये अंदमान-निकोबारच्या योगदानाला दर्शवते. देशाच्या स्वाधीनता आणि इतिहासात या अंदमान-निकोबार बेटाचे अतुलनीय स्थान आहे. चोल साम्राज्यात नौदलाचे केंद्र राहिलेली ही भूमी आहे. आज देशाच्या सुरक्षा आणि विकासाला गती देण्याचं काम या भूमीतून, या बेटावरुन होत आहे, असेही अमित शाह यांनी म्हटलंय. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्याकडून सर्वात पहिल्यांदा तिरंगा ध्वज फडकवण्यात आलेलं हे बेट आहे. तसेच, सेलुलर **(पान ७ वर)**

## अजित पवार गटाकडून विधानसभा निवडणुकीसाठी २० उमेदवारांची यादी जाहीर

### अजित पवार बारामती, संजय बनसोडे उदगीर





मुंबई : देशभरात विधानसभा निवडणुकीचे वातावरण सुरु असल्याचे दिसून येत आहे. सर्व पक्षांकडून जोरदार तयारी सुरू केली आहे. अशातच विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाने पहिला डाव टाकला आहे. नुकतेच पुण्यात अजित पवार गटाची पक्षांतर्गत बैठक पार पडली. त्यामध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटामधील २० उमेदवारांच्या नावांवर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. सर्व उमेदवारांची यादी जाहीर झाली असून त्यांना तयारीला लागण्याचे आदेश देखील देण्यात आले आहेत.

विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी अजित पवार गटाची जारी झालेल्या यादीनुसार बारामती विधानसभा मतदारसंघातून अजित पवार निवडणूक लढवणार आहेत. तर रायगड मतदार संघातून अदिती तटकरे व परळी मतदार संघातून धनंजय मुंडे हे रिंगणात उतरणार **(पान ७ वर)**

## अदानी समूहाची स्विस बँकेतील खाती गोठवली



बर्न : - स्विस अधिका-यांनी अदानीच्या मनी लॉन्ड्रिंग आणि फसवणुकीच्या तपासाचा भाग म्हणून अनेक बँक खात्यांमध्ये जमा केलेले ३१ कोटी डॉलर्स (सुमारे २६०० कोटी रुपये) गोठवण्यात आले असल्याचा दावा करत हिंडेनबर्गने पुन्हा एकदा अदानी समूहावर हल्लाबोल केला. २०२१ पासून ही चौकशी सुरू असल्याचेही म्हटले. हिंडेनबर्गने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स वर पोस्ट शेअर केली असून अदानी समूहाकडून स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

अदानी समूहाच्या प्रवक्त्याने हे आरोप निरर्थक, अतार्किक आणि बिनबुडाचे असल्याचे सांगत स्विस कोर्टाच्या कोणत्याही कार्यवाहीत अदानी समूहाचा सहभाग नाही आणि आमच्या कंपनीचे कोणतेही खाते कोणत्याही प्राधिकरणाने गोठवलेले नाही, असे म्हटले आहे. हिंडेनबर्गचा दावा काय अदानी समूहाशी संबंधित मनी लॉन्ड्रिंग आणि सिक्युरिटीज फ्रॉडच्या आरोपांच्या चौकशीचा एक भाग म्हणून स्विस अधिका-यांनी सहा स्विस बँक खात्यांमध्ये जमा केलेली ३१ कोटी डॉलर्सपेक्षा जास्त रक्कम गोठवली असल्याचा आरोप हिंडेनबर्गने केला. अमेरिकन शॉर्टसेलर हिंडेनबर्ग ग्रुपने नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या स्विस क्रिमिनल कोर्टाच्या रेकॉर्डचा हवाला देत ही माहिती दिली. २०२१ पासून सुरू असलेल्या या तपासात भारतीय समूहाशी संबंधित संशयित ऑफशोर कंपन्यांशी संबंधित आर्थिक व्यवहारांवर प्रकाश टाकण्यात आल्याचेही हिंडेनबर्गने म्हटले.

## केजरीवालांना सर्वोच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर

नवी दिल्ली : दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आम आदमी पार्टीचे (आप) संयोजक अरविंद केजरीवाल यांना मोठा दिलासा मिळाला असून दिल्लीतील कथित मद्य धोरण घोटाळा प्रकरणात अरविंद केजरीवाल यांना सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे.

गेल्या काही महिन्यांपासून अरविंद केजरीवाल तुरुंगात आहेत. मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे अरविंद केजरीवाल यांचा तुरुंगातून बाहेर येण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. काही दिवसांपूर्वी अरविंद केजरीवाल यांच्यावर मद्य धोरण घोटाळा प्रकरणाशी संबंधित आर्थिक गैरव्यवहाराचा आरोप केला होता. यावरुन सीबीआयने त्यांना अटक केली होती. यानंतर अरिंवद केजरीवाल यांनी या अटकेला आव्हान देणारी आणि जामीन मिळण्यासंदर्भातील अशा दोन स्वतंत्र सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या होत्या.

या याचिकेवरील सुनावणी सर्वोच्च न्यायालयात पार पडली होती. सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने ५ सप्टेंबरला झालेल्या सुनावणीदरम्यान याचिकेवरील **(पान ७ वर)**

## धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे भीतीपोटी गुपचुप भूमिपूजन

मुंबई : धारावी पुनर्विकास प्रकल्पावरुन सध्या मोठा वाद सुरु झाला आहे. महाविकास आघाडीने या प्रकल्पाला जाहीर विरोध केला आहे. अदानी समूहाकडे या पुनर्विकास प्रकल्पाचे काम देण्यास महाविकास आघाडीच्या नेत्यांनी नकार दिला आहे असे असतानाही धारावीच्या पुनर्विकासाच्या प्रकल्पाचा भूमिपूजन सोहळा उरकण्यात आला. माटुंगा येथील आरपीएफ मैदानावर धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे भूमीपूजन गुरुवारी करण्यात आले. या भूमिपूजनावरुन आता काँग्रेसच्या खासदार वर्षा गायकवाड यांनी जोरदार टीका केली आहे. विरोधाला घाबरुन अदानींकडून गुपचूप भूमिपूजन केल्याचे वर्षा गायकवाड यांनी म्हटले आहे.

धारावी पुनर्विकास प्रकल्पावरुन सुरु असलेल्या राड्यावरून गोंधळ टाळण्यासाठी कोणताही गाजावाजा या कामाचे भूमिपूजन करण्यात आले. माटुंग्यातील सेक्टर ६ येथे रेल्वे कर्मचा-यांचे निवासस्थान आणि कार्यालयांच्या बांधकामाला सुरुवात करत हा भूमिपूजन सोहळा करण्यात आला. महाराष्ट्र सरकार व अदानी समूहाची संयुक्त कंपनी असलेल्या धारावी पुनर्विकास प्रकल्प प्रायव्हेट लिमिटेडने भूमिपूजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. पहाटे चार ते सात वाजण्याच्या दरम्यान माटुंग्याच्या आरपीएफ मैदानावर हा भूमिपूजन सोहळा पार पडला.

या भूमिपूजन सोहळ्यावरुन धारावीच्या माजी आमदार आणि नवनिर्वाचित खासदार वर्षा गायकवाड यांनी टीकास्त्र डागले आहे. भूमिपूजनाचा नारळ फोडण्याचे काम घाईघाईने आणि **(पान ७ वर)**



नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री



सत्यमेव जयते



एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान

सन्मान बहिणींचा
सन्मान महाराष्ट्राचा

मुख्यमंत्री
माझी लाडकी बहीण योजना

भगिनींच्या संसाराला भरभक्कम आधार
पाठीशी उभे आहे महाराष्ट्र सरकार

शुभहस्ते
एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

प्रमुख उपस्थिती
देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री
अजित पवार
उपमुख्यमंत्री
अदिती तटकरे
मंत्री, महिला व बालविकास

निमंत्रक



प्रा.डॉ.तानाजीराव सावंत
मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण
तथा पालकमंत्री, धाराशिव जिल्हा

-: वेळ :-
१४ सप्टेंबर २०२४
सकाळी ११:०० वाजता

-: स्थळ :-
कोटला मैदान, परंडा
ता.परंडा, जि.धाराशिव



संकेतस्थळ : http://ladakibahin.maharashtra.gov.in

देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री
एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री
अजित पवार
उपमुख्यमंत्री
आदितीताई तटकरे
मंत्री, महिला व बालविकास

महिला व बालविकास विभाग, धाराशिव

# श्रीकृष्ण यादव गणेश मंडळ व रासेयोतर्फे देगलूर महाविद्यालयात वृक्षारोपण




देगलूर(प्रतिनीधी) : येथील श्रीकृष्ण यादव गणेश मंडळ आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने देगलूर महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन व्हावे तसेच विद्यार्थ्यांना पर्यावरणीय शिक्षण देणे या हेतूने श्रीकृष्ण यादव गणेश मंडळ आणि देगलूर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दरवर्षी गणेश उत्सवाच्या काळात महाविद्यालय व देगलूर शहर परिसरात वृक्षारोपणाचे कार्यक्रम राबविले जातात. सदरिल वृक्षारोपण कार्यक्रमात श्री कृष्ण यादव गणेश मंडळाच्या सहकार्याने महाविद्यालय परिसरात नारळ व इतर विविध प्रकारची १५ झाडे लावण्यात आली.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ, उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार , उपप्राचार्य प्रा. उत्तमकुमार कांबळे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.संजय देबडे , डॉ. व्यंकट खंदकुरे, प्रा.गणेश क्यादारे, प्रा. शिवचरण गुरुडे,प्रा.संतोष वानोळे प्रा.डा सुरेश काशिदे, पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील ,प्रा.व्यंकट शेरीकर, प्रा.चमकुडे एम. प्रा. प्रमोद गुजे ,श्रीकृष्ण यादव गणेश मंडळाचे पदाधिकारी माजी उपनगराध्यक्ष अविनाश निलमवार, माजी नगरसेवक सुनील येशमवार , सचिन अक्यमवार , कपिल उल्लेवार, विकास नरबागे यांच्यासह प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

# फहिमुनिसा बागमरू यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार




लातूर/ प्रतिनिधी- डॉ. जाकिर हुसैन विद्यालयाच्या शिक्षिका सौ. फहिमुनिसा मोहम्मद आब्बास बागमरू यांना राज्य उर्दू शिक्षक संघटनेच्या वतीने राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

नुकत्याच झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यामध्ये खा. डॉ. शिवाजी काळगे व छत्रपती संभाजीनगर विभागाचे शिक्षक आमदार विक्रम काळे यांच्या हस्ते सौ. फहिमुनीसा बागमारू यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी राज्य उर्दू शिक्षक संघटनेचे लातूर जिल्हा अध्यक्ष नुसरत कादरी, संघटनेचे एम. ए. गफार यांची उपस्थिती होती.

सौ. फहिमुनीसा बागमारू यांना मिळालेल्या राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराबद्दल जे. टी. एस. बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष जे.टी. शेख, सचिव अॅड. यास्मिन शेख, मालिक शेख, जास्मिन शेख, हासरत शेख, मुस्कान शेख, फिरोज सय्यद, मतीन शेख, मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# आ.अमित देशमुख यांच्या हस्ते औसा हनुमान गणेश श्रीची आरती



**लातूर / प्रतिनिधी-** राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण,सांस्कृतिक कार्य तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी गुरुवार दि.१२ सप्टेंबर रोजी सायंकाळी लातूर शहरातील प्रभाग ८ मधील श्री औसा हनुमान गणेश सांस्कृतिक मंडळास भेट देत श्री चे मनोभावे दर्शन घेतले. या वेळी माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्या हस्ते श्री गणेशाची आरती करण्यात आली.

यावेळी बोलताना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, आज या ठिकाणी उपस्थित राहून श्रीची आरती करण्याचे भाग्य लाभले याबद्दल मनस्वी आनंद व्यक्त करतो या मंडळाने लातूरचा मानाचा गणपती म्हणून आपली एक वेगळी ओळख समाज उपयोगी उपक्रम राबवून निर्माण केली आहे. येथील प्रसादाच्या रूपात मिळणारी वृक्ष भेट कौतुकास्पद आहे. या मंडळा कडून गेली पाच ते सहा दशके केलेले सामाजिक कार्य असेच पुढे अविरत सुरू राहावे आणि ते राहील अशी अपेक्षा व्यक्त करीत उपस्थित श्री औसा हनुमान गणेश सांस्कृतिक मंडळ पदाधिकारी, सदस्य आणि गणेश भक्ताचे लातूर वासीयांचे सर्व विघन दूर व्हावेत अशी प्रार्थना गणराया चरणी करीत सर्वांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी स्वागताध्यक्ष डॉ.उमेश कानडे यांनी श्री आरती साठी आलेल्या सर्व मान्यवरांचे स्वागत करून मंडळाच्या माध्यमातून केले जाणारे समाज कार्य व गणेश मंडळाच्या वैशिष्ट्याची माहिती दिली.

या प्रसंगी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष अॅड. किरण जाधव,विलास सह.साखर कारखाना व्हा.चेअरमन रविंद्र काळे,ट्वेन्टी वन शुगर्सचे विजय देशमुख, डॉ.उमेश कानडे,दगडू अप्पा मिटकरी, अॅड.फारुख शेख, व्यंकटेश पुरी, चंद्रशेखर बसपुरे, भीमाशंकर सिद्धेश्वरे तसेच श्री औसा हनुमान गणेश सांस्कृतिक २०२४ कार्यकारणी अध्यक्ष-प्रा. आशिष स्वामी, कार्याध्यक्ष-विलास गोंदकर, मुख्य संयोजक-डॉ. शिवानंद दडगे, उपाध्यक्ष-नरेश पेददे, नागेश जाधव, सचिव-ओमसाई येरटे, अक्षय गुजर, सह सचिव-धीरज जवळगेकर, धीरज चव्हाण, कोषाध्यक्ष-शशिकांत कनडे, सह कोषाध्यक्ष-अविनाश जवळे, सुरज दंडे, बालाजी झिपरे, तसेच अभिजित पतंगे,विलास आराध्ये, रेवण चिंचोटे, प्रवीण शिवनगीकर, अॅड.रोहित कनडे, चेतन कनडे, मयूर कोरे,सचिन हलकुडे, शैलजा वडजे, अश्विनी कनडे, रुपाली गोंदकर, प्रीती ब्याळे, शीतल स्वामी, दीपिका कनडे, प्रतिमा कनडे, रजनी बनभैरू, शांती येरटे, बाळासाहेब चाकूरकर, शाम भराडीया, शिवा चवरे, डॉ. संजय वारद, नागेंद्र सिद्धेश्वरे, महेश कोळे, पवन तिवारी, आकाश खुब्बा, सुहास देशमुख, शुभम स्वामी,राहुल बाजपाई, कार्तिक कनडे, प्रमोद सोरटे, अनिकेत इंडे, गणेश कनडे, कपिल तांबोळकर, आनंद कोळे, प्रणव कोळे, संदीप हुमनाबादे, अझर तांबोळी, सुरज साखरे, सागर कुंचमवार, अभिजीत बाजपाई, संकेत इंडे, राजेश ढगे, अमित कनडे, राजाभाऊ गोंदकर, श्याम सुरवसे, संतोष टोंगळे, शिवानंद कोळे, अक्षय यशवंत, दत्ता स्वामी, प्रा. विश्वनाथ स्वामी, रुद्रमनी स्वामी, प्रसाद स्वामी,अलोक स्वामी, अॅड.देविदास बोरूळे पाटील, शेख कलीम, प्रा.एम. पी.देशमुख, करीम तांबोळी यांच्यासह श्री औसा हनुमान गणेश सांस्कृतिक मंडळाचे सर्व पदाधिकारी, सदस्य,प्रभागातील नागरिक श्रीगणेश भक्त,महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# मुंबई, पुण्यानंतर लातूरात हमाल, मापाड्यांना माथाडी बोर्ड लागू करण्याचे काम केले

लातूर / प्रतिनिधी- गेल्या दहा वर्षामध्ये महायुती सरकारने राज्याचा आणि देशाचा चौफेर विकास करण्याचे काम केलेले आहे. त्यामुळे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा प्रधानमंत्रीपदी विराजमान होण्याची संधी मिळाली. त्यांच्याच विचारावर लातूर भाजपाची वाटचाल चांगल्या पध्दतीने सुरू आहे. लातूर बाजार समितीच्या सभापतीपदी असताना लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचा चौफेर विकास करण्याचे काम केलेले आहे. शेतकऱ्यांच्या २०० मुलांसाठी सुसज्ज वसतिगृह, १०० हमाल मापाड्यांसाठी गौरीशंकर गृहनिर्माण संस्थेच्या माध्यमातून घरे देण्याचे काम केले. याबरोबरच हमाल मापाड्यांसाठी हमाल भवन निर्माण करून हमाल मापाड्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मुंबई, पुण्यानंतर लातूरात साडेसहा हजार हमाल गाडीवानांसाठी माथाडी बोर्ड लागू करण्याचे काम केलेले आहे, असे प्रतिपादन भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले.

यावेळी ते महाराष्ट्र नागरी बँकेच्या सभागृहात आयोजित हमाल, मापाडी, गाडीवान संघटनेच्या विशेष बैठकीत बोलत होते. यावेळी या बैठकीला व्यापारी संघटनेचे ज्येष्ठ नेते बाबासाहेब कोरे, दिनकर पाटील मसलगेकर, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस निळकंठराव पवार, सुभाषअप्पा सुलगुडले, माजी नगरसेवक अजय दुडिले, नंदकिशोर सोनी, नितीन कोरे, हमाल गाडीवान संघटनेच्या महिला अध्यक्षा ईनुबाई आदमाने, रज्जाक शेख, भाजपा अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश सचिव मुन्ना हाश्मि, संजय गिर, अॅड.गणेश गोजमगुंडे, आकाश बजाज, संतोष तिवारी आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर म्हणाले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी १४० कोटी जनतेच्या आशीर्वादावर तिसऱ्यांदा प्रधानमंत्री पदाची शपथ घेऊन भारतीय राज्यघटनेचा सन्मान करण्याचे काम केले. परंतु खऱ्या राज्यघटनेला बदलण्याचे काम काँग्रेसने केलेले आहे. १९७५ मध्ये इंदिरा गांधीनी आणिबाणी जाहीर करून अनेकांना अटक करण्याचे काम केलेले आहे. यामध्ये जयप्रकाशजी नारायण यांच्यासारख्या राष्ट्रीय नेत्याला व लातूर जिल्ह्यातील अॅड.गोमारे, धनंजय पाटील व कुकडे काका यांनाही अटक झाली होती. यानंतरही जगातील विविध देशाचे युध्द व कोरोना काळातील परिस्थितीवर हिंमतीने मात करीत भारत देशाची चौफेर प्रगती करण्याचे काम देशाचे पंतप्रधान मोदीजींनी केलेले आहे. त्यामुळे जगातील १४ राष्ट्रांनी मोदीजींना सर्वोच्च पुरस्कार देऊन गौरविले. त्यामध्ये सहा मुस्लीम राष्ट्रांचाही समावेश आहे. आताही जगातील ७८ टक्के लोक मोदीजींना पसंती देत आहेत. त्यामुळे त्यांच्या हातून होत असलेल्या प्रगतीमुळे अठराव्या शतकात स्वामी विवेकानंदांनी केलेली भविष्यवाणी खरी ठरून २०३१ मध्ये भारत जगाचे नेतृत्व करेल. असा विश्वासही माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी व्यक्त केला.



यावेळी या बैठकीला गोवर्धनदास भंडारी, मनोज येके, पृथ्वीराज पाटील, नवनाथ माने, शांताबाई धावारे, अर्जून कांबळे, अमोल चलवाड, हेमंत पाटील, चंद्रवर्धन खंदाडे, लहू ठोंबरे, माधव कनामे, परमेश्वर रसाळ, सय्यद मुबारक, पंडीतराव पाटील, श्रीहरी सादले, ज्ञानेश्वर जाधव, सुनिल जगताप, एन.डी.दारफळकर यांच्यासह हमाल, मापाडी, गाडीवान व व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

व्यापाऱ्यांनी जनसंवाद यात्रेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे - अजय दुडिले भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर, भाजपाचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, शहर जिल्हाध्यक्ष देविदासराव काळे, युवा नेते तथा भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये शहरातील मार्केट यार्डातील गौरीशंकर मंदिरात दर्शन घेऊन सकाळी ९.३० वा.जनसंवाद यात्रेचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे आपल्या आणि मार्केट कमिटीच्या चौफेर विकासासाठी लातूर मार्केट यार्डातील व्यापाऱ्यांनी जनसंवाद पदयात्रेत हमाल, मापाडी, गाडीवान व व्यापाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन माजी नगरसेवक अजय दुडिले यांनी केलेले आहे.

## ख्रिस्तियानो रोनाल्डोचा नवा विक्रम

नवी दिल्ली : जगातील महान फुटबॉलपटूंमध्ये ख्रिस्तियानो रोनाल्डोच्या नावाचा समावेश होतो. पोतुर्गाल आणि अल नसरकडून खेळणा-या या दिग्गज फुटबॉलपटूने सोशल मीडियावर एक खास विक्रम केला आहे. सोशल मीडियावर एक अब्ज म्हणजेच १०० कोटी फॉलोअर्सचा टप्पा गाठणारा तो पहिला व्यक्ती ठरला आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर रोनाल्डोची लोकप्रियता त्याच्या नव्या इंस्टाग्राम चॅनेलमुळे आणखी वाढली आहे.

३९ वर्षीय रोनाल्डोने यू ट्यूब अकाउंट बनवले होते आणि एका आठवड्यातच त्याच्या फॉलोअर्सची संख्या ५० दशलक्ष म्हणजेच पाच कोटींच्या पुढे गेली. या काळात त्याने अनेक विक्रम मोडीत काढले. रोनाल्डोचे इन्स्टाग्रामवर ६३९ दशलक्षाहून अधिक फॉलोअर्स आहेत, जे सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर त्याच्या १०० कोटी फॉलोअर्सपैकी सर्वात मोठा वाटा आहे. मँचेस्टर युनायटेड आणि रिअल माद्रिदच्या या माजी खेळाडूचे फेसबुकवर १७०.५ दशलक्ष म्हणजेच १७ कोटी फॉलोअर्स आहेत आणि एक्सवर ११३ दशलक्ष म्हणजेच ११ कोटी फॉलोअर्स आहेत.

चिनी प्लॅटफॉर्म वीबो आणि कुआइशूवर देखील त्याचे काही फॉलोअर्स आहेत. रोनाल्डोने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे. यामध्ये त्याने लिहिले की, माज्यावर विश्वास ठेवल्याबद्दल, तुमच्या समर्थनासाठी आणि माज्या आयुष्याचा एक भाग असल्याबद्दल धन्यवाद. सर्वोत्तम अजून येणे बाकी आहे आणि एकत्र मिळून आम्ही जिंकत राहू, जिंकू आणि इतिहास घडवू. यापूर्वी पोतुर्गालच्या या स्टार फुटबॉलपटूने, ज्याला बॅलोन डी ओरसाठी निवडण्यात आले .

# हॅकेथॉन स्पर्धेत दयानंद कॉलेज ऑफ फार्मसीच्या विद्यार्थ्यांचे नेत्रदीपक यश



लातूर दि:-१३ स्वा. रा.ती.म.वि.नांदेड द्वारा आयोजित स्टार्टअप इनोवेशन आयडिया कॉम्पिटिशन हॅकेथॉन मध्ये दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी च्या विद्यार्थ्यांचे नेत्रदीपक यश.हॅकेथॉन २०२४ हि स्पर्धा विद्यार्थ्यांतील नाविन्यपूर्ण संकल्पना व तंत्रज्ञानाचा शोध घेण्या साठी आयोजित केली जाते. या स्पर्धेत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये व विविध महाविद्यालयातील स्पर्धक संघ सहभागी होते. तर अंतिम फेरीत फक्त वीस संघाचे स्पर्धक विद्यार्थी सहभागी होते.

स्टार्टअप इनोवेशन आयडिया हॅकेथॉन स्पर्धेत महाविद्यालयातील अत्यन्त प्रभावी व समाजोपयोगी विषयावर सादरीकरण केले होते. अत्यन्त चुरशीच्या स्पर्धेत अंतिम फेरीत निवड झालेल्या वीस संघां पैकी दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी च्या दोन संघाना विषय सादरीकरणा करिता प्रवेश मिळाला.त्यातून एका संघाने नॉवेल फिल्म फॉर्मिंग स्प्रे फॉर बोवाइन मास्टिटिस ट्रीटमेंट या विषयाच्या सादरीकरणास प्रथम पुरस्कार मिळाला. या स्पर्धेत दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी च्या प्रा.डॉ.अर्चना येलमटे यांच्या मार्गदर्शना खाली बी.फार्मसीच्या अंतिम वर्षातील विद्यार्थी मोरे शंकर आणि साईनाथ सूर्यवंशी यांनी नॉवेल फिल्म फॉर्मिंग स्प्रे फॉर बोवाइन मास्टिटिस ट्रीटमेंट उत्कृष्ट विषय सादरीकरण करून हॅकेथॉन स्पर्धेचे २०,०००/- रु रोख चे प्रथम पारितोषीक स्वा.रा.ती.म.वि.नांदेड चे कुलगुरू डॉ.मनोहर चासकर व नांदेड जिल्ह्याचे कलेक्टर अभिजित राऊत यांच्या शुभहस्ते मिळविले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल बद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे, ललितकुमार शहा, रमेश राठी, सचिव रमेश बियाणी, कोषाध्यक्ष संजय बोरा व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते आणि समस्त प्राध्यापकवृंद यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे व त्यांच्या मार्गदर्शक प्राध्यापकांचे अभिनंदन केले आहे.

# लातूर जिल्हा बँकेचा यांत्रिकीकरणासाठी धाडसी निर्णय घेणार : दिलीपराव देशमुख

लातूर /प्रतिनिधी- लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने पाच लाखापर्यंत बिन व्याजी कर्ज देण्याचा धाडसी निर्णय त्या निर्णयाचा अनुकरण काही जिल्हा बँकेने करण्याचा प्रयत्न केला पण त्यांनी निर्णय परत घेतला मात्र लातूर जिल्हा बँकेने मात्र निर्णय परत घेतला नाही एकदा पाऊल मागे नाही याचं पद्धतीनें जिल्हा बँकेने हार्वेस्टरसाठी तब्बल १०० शेतकऱ्यांना १०४ कोटी रूपये वाटप करण्याचे धाडस बँकेने केले या प्रत्येकानी एक वर्षात ९० लाखापर्यंत कामही केले बँकेने यांत्रिकी करणासाठी टाकलेले पाऊल मोठया प्रमाणावर यशस्वी झालेले आहे त्यामुळे खरीप हंगामातील सोयाबीन उडीद, तूर, मूग कापणीसाठी यंत्र घेण्यासाठी बँक लवकरच पुढील संचालक मंडळाच्या बैठकीत निर्णय घेईल अशी माहिती राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी जिल्हा बँकेचे मार्गदर्शक दिलीपराव देशमुख यांनी यावेळी बोलताना सांगितले ते लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ४१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलत होते.

यावेळी सभेच्या अध्यक्षस्थानी जिल्हा बँकेचे चेअरमन आमदार धीरज विलासरावजी देशमुख हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून राज्याचे वैद्यकिय शिक्षण मंत्री तथा आमदार अमित विलासराव देशमुख, लातूरचे खासदार डॉ शिवाजीराव काळगे, आमदार बाबासाहेब पाटील माजी आमदार वैजनाथ शिंदे, बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, बँकेचे उपाध्यक्ष अँड प्रमोद जाधव, राज्य साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील,जिल्हा कोंग्रेसचे अध्यक्ष श्रीशैल्य उटगे विलास साखर कारखान्याचे उपाध्यक्ष रवींद्र काळे रेणा चे माजी अध्यक्ष यशवंतराव पाटील ट्वेंटी वन चे उपाध्यक्ष विजय देशमुख, रेणा चे उपाध्यक्ष अनंतराव देशमुख बँकेचे संचालक अँड श्रीपतराव काकडे अशोकराव पाटील निलंगेकर, अशोक गोविंदपूरकर, एन आर पाटील, राजकुमार पाटील, पृथ्वीराज शिरसाठ, व्यंकटराव बिरादार, भगवानराव पाटील तळेगावकर, मारुती पांडे ,अनुप शेळके दिलीप पाटील नागराळकर, सौ स्वयं प्रभा पाटील, श्रीमती लक्ष्मीताई भोसले, सौ अनिता केंद्रे सौ सपना कीसवे स्वीकृत संचालक सुनिल कोचेटा, शीलाताई पाटील विजयकुमार पाटील गणपतराव बाजुळगे, सचिन पाटील यांच्या सह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते .

लोकसभेत बदल केला आता विधासभेत हिसका दाखवा माजी मंत्री दिलीपराव देशमुख सत्तेवर असलेले केंद्र व राज्य सरकार हे शेतकऱ्यांचे जाणीव नसलेले सरकार असून त्यामुळे ज्या पद्धतीने लोकसभेला तुम्ही बदल केला त्याच पद्धतीने आगामी विधानसभेला या सरकारला झटका द्या असे सांगून गेली ४० वर्षापासून सहकाराच्या माध्यमातून जिल्हा बँक अतिशय सुंदर नियोजन करत शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे काम केले आहे बँक ही विश्वासावर चालते ते टिकवण्याचे काम संचालक मंडळ करीत आहे यापुढें करेल असा विश्वास त्यांनी व्यक्त करून जिल्हा बँकेच्या वेगवेगळ्या योजना राबवून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करत शैक्षणीक, शुभमंगल योजना राबवून शेतकऱ्यांना अधिक मदत करता यासाठी बँक आता डिजिटलयाझेशनच्या युगात तंत्रज्ञानाचा वापर करून सी बी एस प्रणालीचा वापर करून ऑनलाइन पद्धतीने सेवा सुरू केल्या आहेत त्याबद्दल जिल्हा बँकेचे चेअरमन आमदार धीरज देशमुख व संचालक मंडळाचे कौतुक केले तसेच जिल्हा बँक कर्मचारी व गट सचिव याना २५ टक्के दिवाळी बोनस जाहीर करण्यात आला असून जिल्ह्यातील सर्व सोसायटी चेअरमन यांना मोबाईल देण्याची घोषणा यावेळी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी केली .

बदलत्या काळानुसार जिल्हा बँकेचे दमदार पाऊल माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांचे प्रतिपादन

लातूर जिल्हा बँक आपल्या दिमाखाने उभी आहे त्याचे सर्व श्रेय आदरणीय दिलीपराव देशमुख यांच्या कडे जाते असे सांगून जिल्ह्यात सहकार क्षेत्राने भरारी घेतली आहे वाडवडिलांच्या पुण्याईचे आज आपण फळे चाखत आहोत असे सांगून लोकनेते विलासराव देशमुख यांनी सांगितल्याने तत्कालीन मुख्यमंत्री बॅरिस्टर अंतुले यांनी लातूर जिल्ह्याची निर्मिती केली लोकनेते विलासराव देशमुख माजी मुख्यमंत्री डॉ शिवाजीराव पाटील निलंगेकर,माजी गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या दूरदृष्टीने जिल्ह्याचा विकासाचा कायापालट झाला असल्याचे सांगून राज्यातील रत्नागिरी पुने रायगड या ठिकाणाच्या जिल्हा बँकेने व्यवसायात बदल केला त्याच धर्तीवर लातूर जिल्हा बँक यशस्वीपणे नवीन तंत्रज्ञान भविष्याचा वेध घेत साखर कारखाने , सहकारी संस्था पतसंस्था शेती माल उद्गोंगाला कर्ज देत आहे भविष्याचा वेध घेत वेगवेगळ्या योजनेतून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे काम करीत असून शेजारील बीड धाराशिव जिल्हा बँकेची काय अवस्था ते बघा इथ लातूर बँक मात्र सहकारी महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांच्या समर्थ नेतृत्वाखाली यशाचे शिखर गाठत यशस्वी वाटचाल सुरु आहे ४० वर्षात निष्कलंक सेवा साधा आरोप सुधा नाही याचे सर्व श्रेय आदरणीय दिलीपराव देशमुख साहेब यांच्या कडे निश्चित पणे जाते या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही ही किमया साहेब यांच्या मुळे घडू शकली असेही ते यावेळी म्हणाले . यांत्रिकीकरणासाठी बँक कर्ज पुरवठा करणार ११ कोटीच्या ठेविवरून ३९४५ कोटी रुपयांचा ठेवी तर ८ हजार कोटी रुपयांचा टर्नर चेअरमन आमदार धीरज देशमुख यांची माहिती यावेळी बोलताना बँकेचे चेअरमन आमदार धीरज देशमुख यांनी लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे ४० वर्षापूर्वी ११ कोटी रुपयांची ठेवी होत्या आता ३९४५ कोटी रुपयांच्या ठेवी झाल्या आहेत ८ हजार कोटीचा टर्नर क्रॉस केलेला आहे त्यामुळे नेतृत्वाला विश्वास दिला अनेक नवीन योजना राबवून शेतकऱ्यांना



कमी व्याज दरात जास्तीत जास्त मदत करता येईल यासाठी माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली प्रयत्न करत असुन लोकांच्या मागण्या असतील त्या आगामी काळात आम्ही पूर्ण करू असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त करून यांत्रिकीकरणासाठी आगामी काळात शेतकऱ्यांना मदत करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगीतले तसेच जिल्ह्यात महिला भगिनींना तब्बल ३१ हजार निः शुल्क खाते उघडून देण्याचा प्रयत्न केला ही आमची सामाजिक बांधिलकी म्हणून कार्य केले तसेच यावर्षी बँकेने जून अखेर ९५.६ टक्के वसुली केली आहे असे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले .

सर्वसाधारण सभेत यांचा झाला सन्मान यावेळी खासदार डॉ शिवाजीराव काळगे,आमदार बाबासाहेब पाटील अशोकराव पाटील निलंगेकर यांनी मनोगत व्यक्त केले वार्षिक सर्वसाधारण सभेत माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांना साखर उद्योग गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा व विलास साखर कारखान्यास बेस्ट शुगर आवार्ड मिळाल्याबद्दल संस्थापक अध्यक्ष आमदार अमित देशमुख,तर नूतन खासदार डॉ शिवाजीराव काळगे व बँकेस डिजिटल सेवा सुरू करून उत्कृष्ठ कार्य करणारे लातूर जिल्हा बँकेचे चेअरमन आमदार धीरज विलासरावजी देशमुख यांचा जिल्हा बँकेच्या वतीने सत्कार करण्यात आला तर यावेळी सहकार महर्षी दिलीपराव देशमुख (अभिभावक) सहकार पुरस्काराने लातूर ,धाराशिव,बीड नांदेड येथील सहकारी पदविका परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या चार विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले त्यात साखरे अजिंक्य (प्रथम) नवनीत भंडारी (द्वितीय) पृथ्वीराज रेखने ( तृतीय) साखरे अजिंक्य यांचा माजी मंत्री दिलीपराव देशमुख माजी मंत्री आमदार अमितजी देशमुख, आमदार बाबासाहेब पाटील आमदार धीरज देशमुख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला . सभेचे वाचन कार्यकारी संचालक हणमंत जाधव यांनी केले सर्व विषयाला एकमताने मंजुरी देण्यात कार्यक्रमास जिल्ह्यातील विविध कार्यकारी सोसायटी चेअरमन पत्संस्थेचे चेअरमन सभासद मोठया संख्येने उपस्थित होते आभार प्रदर्शन जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड प्रमोद जाधव यांनी मांडले.

# यशवंत धाराशिव जिल्हा

शनिवार दि. १४ सप्टेंबर २०२४

३

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane@gmail.com


## बाल संगोपन जनजागृती व मार्गदर्शन शिबिराचे उद्धघाटन बापूराव पाटील यांच्या हस्ते



मुरूम दि. १३ (प्रतिनिधी) – उमरगा जनता सहकारी बँकेचे चेअरमन शरण पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून बागवान एज्युकेशन चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन जनजागृती व मार्गदर्शन शिबिराचे उद्धाटन जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष रशिद शेख, दत्ता चटगे, सिद्राम बालकुंदे, अशोक जाधव, तब्रेश मासुलदार, सतिश चव्हाण, सुजित शेळके, गुलाब अंबुसे, महेमूद बागवान आदींची प्रमुख उपस्थिती होती. शिबिराचा उद्देश बाल संगोपन योजनेची पात्रता व लाभ याबद्दलची सविस्तर माहिती बागवान एज्युकेशन चॅरिटेबल ट्रस्टचे रिझवान बागवान यांनी दिली. जमील चाऊस, मोहसीन बागवान, अमजद शिकलकर आदींनी पुढाकार घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निर्मलकुमार लिमये यांनी तर आभार सफवान बागवान यांनी मानले. यावेळी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आज येथे परंडा मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान कार्यक्रम

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांची उपस्थिती









धाराशिव दि.१३ (प्रतिनिधी) – राज्य सरकारची महत्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राज्यात सुरु करण्यात आली आहे. दि.१४ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता परंडा शहरातील कोटला मैदानात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतंर्गत मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते महिला सशक्तीकरण अभियानाचे उदघाटन करण्यात येणार आहे. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार,महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री तथा पालकमंत्री प्रा.डॉ.तानाजीराव सावंत,खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर,आमदार सर्वश्री सतीश चव्हाण,विक्रम काळे, राणाजगजितसिंह पाटील,ज्ञानराज चौगुले व कैलास पाटील यांची प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थिती राहणार आहे.

या कार्यक्रमात जिल्ह्यातील १० यशस्वी महिलांचा सत्कार करण्यात येणार आहे. विविध विभागांतर्गत ९ महिलांना प्रातिनिधिक स्वरुपात विविध योजनांच्या लाभाचे वाटप, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतंर्गत ५ महिलांना प्रातिनिधीक स्वरुपात लाभाचे वाटप, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतंर्गत १५ महिलांना लाभाचे वाटप करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या ठिकाणी विविध विभागांचे योजनांची माहिती देणारे स्टॉल उभारुन त्यामध्ये महिलांविषयक योजनांची माहिती देण्यात येणार आहे. आरोग्य विभागामार्फत आरोग्य शिबीराचे आयोजन करुन महिलांची आरोग्य तपासणी व सकस आहार यासह स्वच्छता विषयक माहिती देण्यात येणार आहे. कामगार विभागाच्यावतीने महिला कामगारांना भांडी वाटप करण्यात येणार आहेत. महिला आर्थिक विकास महामंडळ आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) यांच्याकडून महिला बचतगटांची नोंदणी करण्यात येवून स्टॉलच्या माध्यमातून महिलांना विविध योजनांची माहिती देण्यात येणार आहे. जिल्हा उद्योग केंद्राच्या वतीने महिलांना उद्योग उभारणीबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतंर्गत आयोजित मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियान कार्यक्रमाला जिल्हयातील महिलांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे यांनी केले आहे.

## महायुती सरकारमुळेच जिल्ह्यात अभूतपूर्व, ऐतिहासिक विकासपर्व

### आ. पाटील यांनी मानले सरकारचे धन्यवाद

धाराशिव दि.१३ (प्रतिनिधी) – जिल्ह्याचा चेहरामोहरा बदलविणार्या अनेक महत्वपूर्ण योजना आणि प्रकल्पांना महायुती सरकारमुळे बळ मिळाले आहे. जिल्ह्याच्या इतिहासात हे पहिल्यांदाच घडत आहे. मागील अडीच वर्षाच्या कालावधीत या अभूतपूर्व व ऐतिहासिक विकासपर्वाची सुरुवात झाली आहे.

ठाकरे सरकारने रखडवलेल्या महत्त्वाकांक्षी कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प, तुळजाभवानी देवीच्या तीर्थक्षेत्राचा विकास, सोलापूर – तुळजापूर – धाराशिव रेल्वे मार्ग, कौडगाव एमआयडीसी टेक्निकल टेक्स्टाइल पार्क, अशा अनेक कामांना महायुती सरकारने बळ आणि गती दिली आहे. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्यासह महायुती सरकारचे मानावे तेवढे आभार कमी आहेत, अशा शब्दांत आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी भावना व्यक्त केल्या.

शनिवारी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार परंडा येथे महिला सशक्तीकरण अभियानांतर्गत आयोजित कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. जिल्ह्यात महायुती सरकारमुळे मागील अडीच वर्षांच्या कालावधीत ऐतिहासिक आणि अभूतपूर्व असे काम झाले आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या जिल्हा दौर्यूच्या पार्श्वभूमीवर आ. पाटील यांनी या सगळ्या कामांचे श्रेय महायुती सरकारला देत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांचे धन्यवाद मानले आहेत.

अनेक वर्षांपासून रखडलेला शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचा किचकट प्रश्न देखील महायुती सरकारने निकाली काढला व आवश्यक जागा वैद्यकीय शिक्षण विभागाच्या ताब्यात देण्यात आली आहे. भविष्यात येथे अद्यावत वैद्यकीय शिक्षण संकुल उभारले जाणार आहे. ज्यामुळे जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या धाराशिव शहराचा अक्षरशः चेहरामोहरा बदलणार असल्याचे आ. पाटील यांनी सांगितले.

कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प आणि हक्काच्या २३.६६ टीएमसी पाण्याचा प्रश्नही निधी अभावी रखडला होता. त्याला महायुती सरकारनेच गती दिली. राज्यात सत्तांतर झाल्यानंतर धाराशिव जिल्ह्याशी निगडीत असलेल्या या महत्वपूर्ण प्रकल्पाला ११,७०० कोटी रूपयांची सुधारीत प्रशासकीय मान्यता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मिळवून दिली. हजारो हेक्टर क्षेत्र या एका निर्णयामुळे ओलिताखाली येणार आहे. टंचाईग्रस्त असलेल्या धाराशिव जिल्ह्याचा कायापालट या एका निर्णयामुळे होणार आहे. त्याचबरोबर कौडगाव एमआयडीसीत तांत्रिक वस्त्रोद्योग निर्मिती प्रकल्प एमआयडीसीच्या माध्यमातून उभारला जाणार असल्याची घोषणा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केली आहे. त्यामुळे १० हजार युवकांच्या हाताला काम मिळणार आहे.

तुळजाभवानी देवीचे तीर्थक्षेत्र वैष्णोदेवीप्रमाणे राष्ट्रीय पातळीवर अधिक ठळकपणे यावे आणि आंतरराष्ट्रीय पर्यटकही तुळजाभवानीच्या नगरीत यावा, यासाठी आपले प्रयत्न सुरू आहेत. केंद्र सरकारच्या प्रशाद योजनेतून निधी मिळावा, यासाठी एकीकडे पाठपुरावा सुरू असतानाच महायुती सरकारने तुळजाभवानी तीर्थक्षेत्र विकास आराखड्याला मान्यता दिली आहे. त्यामुळे तुळजापूर आणि परिसरातील अर्थकारणाला अभूतपूर्व अशी गती लाभणार असल्याचा विश्वासही आमदार पाटील यांनी व्यक्त केला आहे.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम आणि प्रधानमंत्री रोजगार निर्मीती कार्यक्रमात राज्यात धाराशिव जिल्हा अव्वल आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात तरूणांच्या आणि माता भगिनींच्या हाताला महायुती सरकारमुळे रोजगार उपलब्ध झाला आहे.

राज्यातील महायुती सरकारने आपल्या हिश्श्याचा ५० टक्के वाटा दिल्यामुळे तुळजाभवानी देवीचे तीर्थक्षेत्र रेल्वेच्या राष्ट्रीय नकाशावर आले आहे. अशा अनेक प्रकल्प आणि योजनांना मागील अडीच वर्षांच्या काळात मिळालेले ऐतिहासिक बळ जिल्ह्याच्या अर्थकरणाला बळकटी देणारे आहे. त्यासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि महायुती सरकारचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी धराशिवकरांच्या वतीने मनस्वी आभार मानले आहेत.

## जिल्ह्यातील दहा खो खो खेळाडूंची शासन सेवेत थेट नियुक्ती



धाराशिव दि.१३ (प्रतिनिधी) – महाराष्ट्र सह देशाला विविध खेळातून सुवर्णपदक मिळवून देत राज्याची मान उंचावणाऱ्या खेळाडूंना ना कोणतीही परीक्षा, वा इंटरव्यू न देता राज्य शासनाने महाराष्ट्रातील विविध खेळाडूंना थेट नियुक्ती देत सरकारी नोकरी दिली आहे.

धाराशिव जिल्ह्याला खो खो ची पंढरी म्हणून ओळखले जाते. त्यातीलच एकूण दहा खो खो खेळाडूंची महाराष्ट्र शासनाने थेट नियुक्ती द्वारे सरकारी नोकर भरती केली आहे.त्यामध्ये धाराशिव जिल्ह्यातील आंतरराष्ट्रीय खो खो खेळाडू निकिता पवार व गौरी शिंदे यांची राजपत्रित अधिकारी वर्ग २ पदी थेट नियुक्ती झाली आहे. तर राष्ट्रीय सुवर्णपदक विजेते कुमारी ऋतुजा खरे, संपदा मोरे, मयुरी पवार, प्रीती काळे, जानव्ही पेठे, किरण शिंदे व निखिल मस्के यांचे वर्ग ४ पदी थेट नियुक्ती झाली आहे.

या नियुक्ती बद्दल महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे मनापासून आभार तसेच महाराष्ट्र खो खो असोसिएशनचे सचिव प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव यांनी घेतलेल्या विशेष परिश्रमामुळे अधिक अधिक खो–खो खेळाडूंना शासन सेवेत नोकरी लागण्यासाठी मदत झाली आहे. वरील सर्व खेळाडू हे धाराशिव जिल्ह्यातील विविध ग्रामीण भागातील आहेत जिथे कोणत्याही अत्याधुनिक सुविधा नसताना धाराशिव जिल्ह्याच्या खो खो मैदानावर सराव करत वरील यश संपादन केले आहे आजपर्यंत जिल्ह्याचे अनेक खो खो खेळाडू शासन सेवेत थेट नियुक्ती झाले आहेत.यामध्ये आता नियुक्त झालेल्या खेळाडूंसाठी भारतीय महासंघाचे सहसचिव व महाराष्ट्र खो खो असोसिएशनचे सचिव प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव यांनी घेतलेल्या अविरत परिश्रमामुळे हे यश मिळाले आहे. असे धाराशिव जिल्हा खोखो असोसिएशनचे अध्यक्ष अनिल खोचरे व सचिव प्रवीण बागल यांनी सांगितले आहे. खो खो मैदानावर प्रवेश घेतल्यापासून त्या खेळाडूंचे खेळासोबत जीवन घडवण्यापर्यंतची अनमोल जबाबदारी आमचे पालक म्हणून कायम आमच्या पाठीशी असणारे आमचे मार्गदर्शक प्रा . डॉ चंद्रजीत जाधव सर यांना आमचे सर्व श्रेय जाते असे अंतराराष्ट्रीय सुवर्णपदक विजेती खेळाडू निकिता पवार व गौरी शिंदे यांनी सांगितल

## नूतन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस.सी. खती



धाराशिव दि.१३ (प्रतिनिधी) – राज्यातील न्यायाधीशांच्या बदल्या झाल्या असून धाराशिव येथील जिल्हा विधी सेवा प्राधिकारणचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश म्हणून बुलढाणा येथील न्या. एस.सी. खती यांची बदली झाली आहे. तर न्या अंजु शेंडे यांची अहमदनगर येथील जिल्हा न्यायालयात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश म्हणून बदली झाली आहे. तसेच राज्यातील ४० न्यायाधिशांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

## उमरगा व लोहारा तालुक्यातील समस्या तात्काळ सोडवाव्यात – स्वामी




उमरगा दि.१३ (प्रतिनिधी) – उमरगा शहरासह उमरगा व लोहारा तालुक्यामधील शेतकऱ्यांच्या व अन्य नागरिकांच्या जिवाळ्याशी निगडित मूलभूत समस्या तात्काळ सोडवाव्यात. अन्यथा १७ सप्टेंबर रोजी आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा सातलिंग स्वामी यांनी एका निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांना दि.१२ सप्टेंबर रोजी दिला आहे.

दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, उमरगा लोहारा तालुका गत १५ वर्षांपासून विविध समस्यांनी ग्रासलेला आहे. उमरगा व लोहारा तालुक्याला लोकप्रतिनिधी आहे का नाही ? नागरिकांच्या मूलभूत समस्या सुटत नसल्याने नागरिकांचे अतोनात हाल होत असून त्यांच्या हाल अपेष्टा सहन करण्याचा अंत झाला आहे. उमरगा शहरांमध्ये घाणीचे साम्राज्य पसरले असल्यामुळे सांडपाण्याची व्यवस्था करावी. तर शहरातील विविध भागातून गटारीचे पाणी राष्ट्रीय महामार्गावर येत असल्याने ते पाणी रस्त्यावर साचून डबकी तयार झाली आहेत. त्यामध्ये डासांची उत्पत्ती होऊन नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे बंदिस्त गटारी करून पाण्याची विल्हेवाट लावावी. तसेच उमरगा शहरामध्ये जागोजागी कचऱ्याचे ढीग जमा झाले आहेत, त्या कचऱ्याची तात्काळ विल्हेवाट लावावी. उमरगा शहरांमध्ये व संपूर्ण उमरगा व लोहारा तालुक्यामध्ये विजेचा सतत लपंडा होत असतो. सतत वीज जाण्याने नागरिकांना डासांचा त्रास होत असून चोऱ्यांचे प्रमाणही अफाट वाढले आहे. त्यामुळे वारंवार वीज खंडित होणार नाही याची सूचना संबंधित विभागाला द्यावी. शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न म्हणजे शेतीसाठी दिवसा बारा तास अखंडितपणे वीज पुरवावी जेणेकरून पिकांना पाणी तर देता येईलच शिवाय दिवसा लाईट चालू राहिल्यामुळे रात्रीचा धोका टळेल. उमरगा व लोहारा तालुक्यातील विविध बँकांकडून शेतकऱ्यांना सिबिल स्कोर चांगला नाही म्हणून पीक कर्ज दिले जात नाही. कोणत्या बँका कर्ज देत नाहीत त्या बँकांच्या शाखाधिकार्यावरती तात्काळ गुन्हे दाखल करावेत व शेतकऱ्यांचे पीक कर्ज तात्काळ मंजूर करण्याविषयी आदेशित करावे. उमरगा शहरांमध्ये पावसाळ्यामुळे अनावश्यक गवत भरमसाठ वाढले आहे त्याचे तात्काळ निर्मुलन करण्यात यावे. घाणीमुळे गटाराचे पाणी रस्त्यावर येत असल्यामुळे डासांची उत्पत्ती होऊन नुकतेच दोन बालकांचा डेंग्यूमुळे मृत्यू झाला, याचे गांभीर्य लक्षात घेऊन डासांचा नायनाट करण्यासाठी उमरगा व लोहारा तालुक्यातील प्रत्येक गावात तात्काळ धूर फवारणी करावी. उमरगा व लोहारा शहरातील मोकाट जनावरांचा वाहतुकिला अडथळा तर होत आहेच शिवाय झाडांची नासधुसही होत असून अपघातांचे प्रमाणही वाढत आहे. त्यामुळे त्यांना गोशाळेमध्ये दाखल करा किंवा अन्यत्र व्यवस्था करावी, अशी मागणी केली आहे. मागण्या दि.१६ सप्टेंबरपर्यंत मान्य न झाल्यास १७ सप्टेंबर रोजी उमरगा येथील उपविभागीय कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण करण्यात येणार असल्याचा ही शहरात स्वामी यांनी दिला आहे.

## उद्या तथागत गौतम बुद्ध व डॉ. आंबेडकर यांच्या अस्थिकलश महायात्रेचे होणारा आगमन




धाराशिव दि.१३ (प्रतिनिधी) – इंडो एशिया मेता फाउंडेशन भारत, नागेश नगरी अस्थी कलश महायात्रा समिती धाराशिव व जम्बुद्वीप बहुउद्देशीय सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या तथागत गौतम बुद्ध व महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थिकलश महायात्रेचे जिल्ह्यात दि.१५ सप्टेंबर रोजी आगमन होणार आहे. या महायत्रेचे स्वागत करण्यासाठी ठिकठिकाणी जय्यत तयारी करण्यात आली असल्याची माहिती महायात्रा समितीचे समन्वयक पृथ्वीराज चिलवंत यांनी दिली.

तथागत गौतम बुद्ध व डॉ महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी कलश महायात्रेस दि.१० सप्टेंबर रोजी पुणे येथून झाली आहे. या महायात्रेत पूज्य भन्ते रेवात महाथेरो (श्रीलंका), पूज्य भन्ते पलामोधम्मो महाथेरो (व्हिएतनाम), देवमित्ता महाथेरो (श्रीलंका), पुज्य भन्ते प्रियदर्शी महाथेरो (भारत), पुज्य भन्ते होआई व्हू महाथेरो (व्हिएतनाम), पुज्य भन्ते वेलीविठीये महाथेरो (श्रीलंका) व पुज्य भन्ते धम्मसार थेरो (महाराष्ट्र) आदींचा समावेश आहे. ही महायात्रा धाराशिव जिल्ह्यात दि.१५ सप्टेंबर रोजी सकाळी ७ वाजता तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथे दाखल होणार असून या ठिकाणी यात्रेचे स्वागत केल्यानंतर सुरतगाव येथे भिक्षू संघास भोजन दान करण्यात येणार आहे. तर तुळजापूर येथे सकाळी ११ वाजता आगमन व शहरात मिरवणूक काढण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच धाराशिव शहरात दुपारी १२.४५ वाजता दाखल होणार असून या महायात्रेची मिरवणूक अहिल्यादेवी चौक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौक, डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौक, संत गाडगेबाबा चौक त्रिशरण चौक, अंबाला हॉटेल चौक, आर्य समाज मंदिर चौक मार्गे पुष्पक मंगल कार्यालयपर्यंत काढण्यात येणार आहे. तसेच श्रीलंका व व्हीएतनाम येथील भिक्षू संघाचे भन्ते धम्मदेसणा देणार आहेत. तर याच ठिकाणी अडीच हजार वर्षापूर्वीच्या तथागत गौतम बुद्ध यांच्या अस्थी व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी कलश दर्शनासाठी ठेवण्यात येणार आहेत. या महायात्रेमध्ये सर्वांनी सहभागी होऊन दोन्ही महामानवाच्या अस्थिंच्या दर्शनाचा लाभ घ्यावा, असे महायात्रेचे संयोजक पृथ्वीराज चिलवंत, कैलास शिंदे, अरुण बनसोडे, विशाल शिंगाडे, सुनील बनसोडे, नितीन लांडगे, राजन जोगदंड, विनोद जाधव, ऍड रामचंद्र ढवळे, दीपक सरवदे, स्वराज जानराव आदींसह संयोजन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.



# संपादकीय

## वाढता संभ्रम

भाजपमधील एका गटाला राज्यात मैत्रिपूर्ण लढती होणे अपेक्षित असल्याची चर्चा आहे. निवडणुकीनंतर युती अथवा आघाडीला स्पष्ट बहुमत न मिळाल्यास आपण किंगमेकर' ठरू शकतो, असा शिवसेना (उद्धव गट) आणि अजित पवार गटाचा आडाखा आहे.

महाराष्ट्राला विधानसभा निवडणुकांचे वेध लागले आहेत. निवडणुका जशा जवळ येत आहेत तसे राजकीय चित्र स्पष्ट होण्याऐवजी संदिग्धता वाढत चालली आहे. महायुतीमधील तीनही पक्षांमध्ये समन्वयाचा अभाव दिसतो. अजित पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अस्वस्थ असल्याचे संकेत मिळत आहेत. महाविकास आघाडीमधील स्थिती वेगळी नाही. मुख्यमंत्री पदाबद्दल उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला कोणताही शब्द देण्यास काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष तयार नाही. जागा वाटपामध्ये नेमके काय स्थान राहणार, यावर शिवसेना उद्धव गटाची पुढील भूमिका अवलंबून राहील, असे मानण्यास वाव आहे. अजित पवार यांची अलीकडच्या काळातील विधाने महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात सर्वाधिक चर्चेचा विषय ठरली आहेत. बारामती लोकसभा मतदारसंघात बहिणीविरुद्ध पत्नीला उमेदवारी देऊन चूक केली, असे ते म्हणाले. घरात फूट पाडण्याचा प्रयत्न समाजाला देखील आवडत नाही', असे विधान त्यांनी केले. धर्मारावबाबा अत्राम यांच्या कन्या भाग्यश्री अत्राम राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटात चालल्या आहेत. अत्राम अजित पवारांबरोबर आहेत. मंत्र्याचीच कन्या वडिलांची साथ सोडून दुसऱ्या पक्षात जाणार असल्याने राजकीय पडसाद अपेक्षित होतेच. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेवर युतीच्या बऱ्याच आशा आहेत. अजित पवार उपमुख्यमंत्री आणि अर्थ मंत्री. अर्थ मंत्रालयाने लाडकी बहीण योजनेसाठी तरतूद केली, हा संदेश देण्याचा प्रयत्न अजित पवार यांच्या राष्ट्रवादीकडून होत आहे. राष्ट्रवादीच्या कार्यक्रमात त्या योजनेच्या फलकांवरून मुख्यमंत्री' हा शब्द वगळला गेला. भाजपसाठी आता संघ सक्रिय झाला आहे. वेळ निघून गेल्यावर सरसंघचालक भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाला वेगवेगळ्या मुद्द्यांवरुन सुनावत आहेत आणि महाराष्ट्रात संघाची फळी भाजपसाठी कामाला लागल्याचे सांगितले जात आहे. अजित पवार यांना सोबत घेतल्याने लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपचे नुकसान झाले, असे संघाचे म्हणणे असल्याचे सांगण्यात येते. आता बोलका' झालेला संघ महायुतीच्या रचनेबद्दल भाजपच्या काही नेत्यांमार्फत भूमिका मांडत आहे. ही बाब अजित पवार गटाला रुचलेली नाही.

जागा कोणाला किती?

विधानसभेसाठी अजित पवार गटाला किती जागा मिळणार, हा कळीचा मुद्दा ठरेल. भाजपने मिशन १२५'ची तयारी केली आहे. १२५ जागा जिंकायच्या तर किमान दीडशे जागा लढविल्या पाहिजेत! मग लोकसभेत बरी कामगिरी करणाऱ्या शिंदे यांच्या शिवसेनेला आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदरात किती जागा पडणार? हा प्रश्नच आहे! शिंदे यांच्या पक्षाला जेवढ्या जागा मिळणार तेवढ्या जागा आम्हालाही मिळाव्यात, हे अजित पवार गटाकडून सूचित झाले आहे. संघप्रणित भूमिकेतून भाजपच्या काही नेत्यांनी केलेल्या विधानांवर, आमचे बोलणे अमित शहांशी होते' अशी भूमिका अजित पवार गटाकडून घेण्यात आली. मात्र, अमित शहांच्या मुंबई दौर्यातील बैठकीपासून अजित पवार दूर राहिले, विमानतळावर त्यांची आणि शहांची भेट झाली असली तरी संभ्रम कायम राहिला आहे. शिवसेना शिंदे गटाकडून देखील अजित पवारांच्या राष्ट्रवादीबद्दल आक्रमक सूर दिसतो. अशावेळी पक्षातील फूट आणि काही निर्णयांबद्दल चुकीची कबुली देत अजित पवार भाजपला इशारा देत आहेत, हे तर उघड आहे, त्याचवेळी नंतरचे पर्यायही त्यांच्याकडून खुले ठेवले जात आहेत, असे जाणवते. मागील विधानसभा निवडणुकीनंतर शिवसेनेने निवडणुकपूर्व युती तोडत मुख्यमंत्री पद मिळवले. भाजपला रोखण्यासाठी दोन्ही काँग्रेसकडे त्याशिवाय पर्याय नव्हता. लोकसभा निवडणुकीनंतर देशात बदललेले राजकीय चित्र पाहता काँग्रेस शिवसेनेसाठी तडजोड करण्याची शयता नाही. त्यामुळे उद्धव यांच्या शिवसेनेसाठी पुन्हा एकदा अस्तित्वाचा प्रश्न उभा राहिला असून अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचीही स्थिती त्याहून वेगळी नाही.

# इंजिनियरचे आव्हान



जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे ३७० वे कलम मोदी सरकारने रद्द केले. त्याबद्दल राज्यात असंतोष आहे, की त्यास पाठिंबा मिळेल याचा फैसला ही निवडणूक करेल. त्यामुळे भाजप जास्त चिंतेत आहे.

त्याचा पक्ष मोठा नाही किंवा प्रभावशाली नाही. तरीही 'इंजिनियर' रशीद या व्यक्तीला मोठे वलय आणि महत्त्व प्राप्त झाले आहे. तो भारतीय जनता पक्षाचा छुपा प्रतिनिधी आहे असा आरोप अन्य पक्ष करत आहेत. भाजप त्याचे वर्णन फुटिरतावादी असे करत आपला त्याच्याशी काही संबंध नाही हे दाखवत आहे. जम्मू-कश्मीर अवामी इत्तेहाद पक्ष' या पक्षाचा शेख रशीद संस्थापक अध्यक्ष आहे. तो सरकारी कर्मचारी होता. नोकरी सोडून तो राजकारणात उतरला. २००८ व २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत तो जिंकलाही होता. गेली पाच वर्षे रशीद तुरुंगात आहे. अतिरेयांना आर्थिक मदत केल्याचा त्याच्यावर आरोप आहे. या वर्षी लोकसभेची निवडणूक तो तुरुंगातून लढला आणि बारामुल्लाचा खासदारही बनला. केवळ सदस्यत्वाची शपथ घेण्यापुरता तो तुरुंगाबाहेर आला होता; पण आता जम्मू-काश्मीर विधानसभेच्या निवडणुकीच्या प्रचारासाठी येत्या दि. २ ऑटोबरपर्यंत त्याला जामीन मंजूर झाला आहे. तिहारमधून बाहेर आल्यावर पत्रकार परिषदेत त्याने भाजपच्या राजकारणाचा बळी असताना आपण भाजपचे हस्तक कसे असू शकतो?' असा सवाल करून सर्वच पक्षांना निरुत्तर केले. त्याच्या टीकेचा मुख्य रोख भाजप व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर असल्याने तो पक्ष संतापला आहे.

मर्यादित' उमेदवार

शेख रशीद मूळचा विज्ञान शाखेचा पदवीधर, नंतर त्याने सिव्हिल इंजिनिअरिंगची पदविका प्राप्त केली. राज्य सरकारच्या प्रकल्प बांधकाम विभागात त्याने नोकरी केली. त्यामुळे बहुधा त्याला 'इंजिनिअर' हे टोपण नाव मिळाले. काश्मिरींना स्वयंनिर्णयाचा अधिकार मिळावा ही त्याची मागणी आहे. ती कोणताही पक्ष मान्य करणार नाही. काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे ही देशाची प्रथमपासूनची भूमिका आहे व ती योग्यही आहे. त्यामुळे सर्वच पक्ष त्याच्यापासून दूर राहू इच्छित आहेत; पण त्याने लोकसभेची निवडणूक जिंकून सर्वांनाच धक्का दिला. त्याच्यामुळे राज्याच्या कोणत्या भागात कोणाचे गणित बिघडणार याची चिंता सर्व पक्षांना आहे. मतदार संघांच्या फेररचनेनंतर जम्मू भागातील मतदार संघ वाढले आहेत. ते भाजपच्या पथ्यावर पडले आहे. किंबहुना आपल्या सोयीनुसार भाजपनेही फेररचना केल्याचा आरोपही झाला होता. तरीही उमेदवारांची पहिली यादी प्रसिद्ध केल्यावर काही तासांत रद्द करण्याची नामुष्की भाजपवर ओढवली होती. राज्याच्या दोन माजी उपमुख्यमंत्र्यांना पक्षाने उमेदवारी नाकारली. काश्मीरमध्ये ४७ जागा आहेत; पण भाजपने तेथे केवळ १९ जागा लढवण्याचे ठरवले आहे. या व अन्य कारणांनी जम्मू व काश्मीर या दोन्ही भागांत भाजपमध्ये मोठा असंतोष आहे. राज्यातील सर्व ९० जागा पक्ष लढवेल व आपले सरकार स्थापन करेल असे गृहमंत्री अमित शहा यांनी जाहीर केले होते. कमी उमेदवार उभे करून हे कसे शय आहे? काश्मीर खोर्यात श्रीनगरची जागा वगळता अन्य कोठेही विजय मिळणार नाही हे वरिष्ठ नेतृत्वास माहीत असल्याने जाहीर झालेले उमेदवार डमी' स्वरूपाचे आहेत असे भाजपचेच स्थानिक नेते म्हणत आहेत. मित्र पक्ष व छोट्या पक्षांचे उमेदवार व अपक्ष 'इंडिया' आघाडीच्या उमेदवारांचा पराभव करतील, मग त्या विजयी उमेदवारांना आपल्याकडे वळवून आपली शक्ती वाढवता येईल अशी भाजपची व्यूहरचना असावी. पक्ष व रा.स्व.संघात राम माधव हे बडे प्रस्थ आहे. भाजपची या राज्यातील व्यूहरचना ते सांभाळत आहेत. भाजपच्या व्यूहरचनेस इंडिया' आघाडी कशी प्रतिसाद देते त्यावरही बरेच अवलंबून आहे. इंजिनिअर रशीदला कितपत पाठिंबा मिळेल हाही प्रश्न महत्त्वाचा आहे. त्याच्या पत्रकार परिषदेनंतर माधव यांनी, भारत विरोधी कारवायांबद्दल तुरुंगात असलेला हा विभाजनवादी खोर्यातील राजकारण दूषित करत आहे, अशी टीका केली. मोदी व ३७० वे कलम याबद्दल त्याने केलेल्या विधानांमुळे ते संतप्त झाले आहेत. आपल्याला संसदेत बोलू द्यावे असे आवाहन रशीदने मोदी व शहा यांना केले आहे. सर्वच पक्षांसमोर रशीदने आव्हान उभे केले आहे हे नक्की.

# महान हटयोगी विसोबा खेचर

विचारधन : प्रा. डॉ. प्राची गडकरी
संत साहित्याच्या अभ्यासक

महादेव योगशास्त्रावर चर्चा करताना पार्वतीस म्हणाले, सर्व सिद्धी प्रदान करणारी एकच मुद्रा आहे ती, म्हणजे खेचरी मुद्रा! ही मुद्रा मला प्राणापेक्षा प्रिय आहे. परंतु, भक्तांच्या आग्रहाखातर मी खेचरी मुद्रा कुंडलीनी योगात प्रकट केली. खेचरी मुद्रेच्या सहाय्याने योगी कंठाच्यावर असलेली कुंडलीनी शक्ती जागृत करु शकतो. शाण्डिल्य उपनिषदात कुंडलीनी शक्ती योग्याच्या शरीरात कंठाच्या वरच्या भागात असून, ती मोक्षप्रद आहे. तशी ही कुंडलीनी शक्ती शरीरात खालच्या भागात (माकडहाडाजवळ) वेटोळे करून सुप्तावस्थेत सुध्दा असते.

खेचरी मुद्रेत ख' म्हणजे आकाश आणि चरी' म्हणजे फिरणारी किंवा प्रवेश करणारी. जीभ उलटी फिरवून टाळूला भिडवून मागे नेत पडजीभ ओलांडून ही जीभ मेंदूकडे जाणाऱ्या कपाल कहरात प्रवेश करत अनुनासिक पोकळीतून वर टाळूपर्यंत जाते. डोळ्यांची बुबुळही तेव्हा भुवयीच्या वरती जाऊन समाधी अवस्थेत जातात. ह्या यशस्वी साधनेत चित्त शारीरिक पातळीवरून विलग होऊन आकाशात किंवा शुन्यमंडलात विहार करते. योगविद्येत अनन्यसाधारण महत्त्व असलेली ही खेचरी मुद्रा कुंडलीनी योग विषयक ग्रंथामध्ये ज्या दहा अतिमहत्त्वाच्या मुद्रा सांगितल्या आहेत. त्या सर्व मुद्रांनी एकमुखाने खेचरी मुद्रेस गौरवले आहे. ह्या मुद्रेसाठी हटयोगी साधनेने उच्च स्तरावर असावा लागतो. कारण हा व्यापक अध्यात्मिक प्रवासाचा भाग आहे. अशी ही खेचरी मुद्रा ज्या हटयोग्याला शरण गेली ते महान योगी आणि महाराष्ट्रातील थोर संत म्हणजेच संत विसोबा खेचर! औरंगाबाद मधील मुंगी गावी जन्मलेले विश्वनाथ महामुनी ज्यांना कधी विसा सोनार तर कधी कपड्याच्या व्यावसाय करणारे ते चाटी! म्हणून विसोबा चाटी नावाने ओळखले जात होते; पण त्यांची विसोबा खेचर ही ओळख ज्ञानेश्वर भावंडांच्या सानिध्यात आल्यावर महाराष्ट्राला झाली. निवृत्तीनाथांनी मांडे खाण्याची इच्छा दर्शविल्याने खापरासाठी मुक्ताबाई कुंभार वाड्यात खापर आणायला गेल्या, परंतु, विसोबांनी वाळीत टाकलेल्या मुलांना खापरं द्यायची नाहीत, हा आदेश कुंभारवाड्याला दिल्याने कोणीही मुक्ताबाईंना खापर दिले नाही. परंतु, ज्या क्षणी विसोबांनी पाहिले की मुक्ता ज्ञानोबांच्या पाठीवर मांडे भाजतेय! ज्ञानेश्वर महाराजांनी योगसाधनने आपल्या जठार अग्नी प्रज्वलित केला आहे. त्याक्षणी ज्ञानेश्वर भावंडांच्या प्रचंड साधनेची विसोबांना जाणिव झाली. आपली चूक त्यांच्या लक्षात आली आणि त्यांनी ज्ञानेश्वरांच्या पायावर डोके ठेवले. आपल्याला माफी मिळावी आणि शिष्य म्हणून आपला स्वीकार व्हावा, अशी प्रांजळ मागणी त्यांनी मुक्ताबाईंच्या चरणी केली. मायेच मूर्तीमंत रूप असणाऱ्या माऊलींनी त्यांना क्षमा देऊन शिष्यत्व सुध्दा बहाल केले. त्या दिवसापासून विसोबा ज्ञानेश्वर भावंडांसोबत राहू लागले. माऊलींच्या मुखातून पडणारा प्रत्येक शब्द ते टिपून ठेवत.

कुंडलिनी साधना

विसोबांची शब्दकळा टिपण्याची एकाग्रता आणि प्रामाणिकता पाहून मुक्ताई एकदा गंमतीने म्हणाल्याही अगदी खेचर साधनेतील शिष्य वाटतायत तुम्ही! अर्थात इथे कुंडलीनीची खेचर साधना आणि त्यातून मिळणारे सूख समाधान हा भावार्थ विसोबांना कळलाच नाही. तो भावार्थ माऊलींकडून शिकता शिकता विसोबा संत नुसते पदाला गेले नाहीत तर, नियमित साधना, वैराग्य, जप-अजप यांच्या सहाय्याने त्यांनी खेचरी अवस्था प्राप्त करून घेतली. किंबहुना शक्तीला शरण गेल्यावर कुंडलीने स्वतः विसोबांच्या साधनेला खेचरी मुद्रेत घडवून आणले आणि तेव्हा पासूनच विसोबा खेचर ह्या नावाने ते ओळखले जाऊ लागले. पुढे ज्ञानेश्वरांचा आशीर्वाद आणि मुक्ताबाईंचा उपदेश घेऊन ते जुनाट शैव पीठ अर्मदकपुर येथे वास्तव्य करू लागले. याच ठिकाणी त्यांनी देवाविण ठाव रिता कोठे म्हणत नामदेवांना गुरूमंत्र दिला.

विसोबांकडून अनुग्रह घ्यायची प्रेरणा नामदेवांना विठ्ठला कडून मिळाली असली तरी, त्यामागे मुक्ताबाईंची धीटाई होती. सतत पांडुरंगाच्या सहवासात असलेल्या आणि भक्तीच प्रचंड रूप समजल्या जाणाऱ्या नामदेव महाराजांना सगळ्यां समोर जेव्हा मुक्ताबाई म्हणाल्या की,

गुरू विना तुझं।
नाहीच रे मोक्ष।
होशील साधक।
मुमुक्ष तू

तेव्हा नामदेवांनी थेट पांडुरंगाला विचारले की, माझ्यावर तुझे आशीर्वाद आहेत. तू माझ्या जवळ आहेस, मग मला कशाला हवाला हवा गुरू? तेव्हा स्वतः पांडुरंग म्हणाले नाम्या मी तुला प्रेम, स्नेह माया ममता देऊ शकतो; पण ज्ञान तुला केवळ गुरूच देऊ शकतो. तेव्हा नामदेव राउळातून विचारातच बाहेर पडले. चालत-चकलत खूप दूर गेले आणि तेव्हा त्यांची नजर ज्या देवळावर पडली त्या देवळात शंकराच्या पिंडीवर पाय ठेवून एक म्हातारा झोपला होता. ती म्हातारी व्यक्ती म्हणजेच विसोबा खेचर!

नामदेवांचे गुरू

जेव्हा नामदेवांनी पिंडीवरचा त्यांचा पाय बाजूला काढला, तेव्हा तिथे नवीन पिंड तयार झाली. अशा कैक पिंडी झाल्यावर हा काहीतरी चमत्कार आहे, असे वाटून नामदेव शरण गेले. विसोबांना आणि तिच गुरू शिष्याची पहिली भेट होती. देव केवळ राऊळात नसून, तो चराचरात भरून आहे, हे विसोबांनी नामदेवांना सांगितले.

आपलं संपूर्ण आयुष्य लोकांसाठी जगणाऱ्या विसोबांनी जेव्हा जेव्हा दुष्काळ पडला तेव्हा तेव्हा दुष्काळ पिडीतांना वाटले ती मदत करत स्वतः जवळचे सारं काही लोकांना वाटून टाकले. शेत राखणीचे काम करताना एकदा वारकऱ्यांना शेतातील कणस भुकेला दिली. पठाणाकडून पैसे उसने घेऊन त्याचे ध्यान विकत घेऊन लोकांना खाऊ घातले. बदल्यात पठाणाने भरपूर त्रास विनोबां दिला; पण ज्या शेतातील कणस लोकांना खाऊ घातली त्या शेतात पुन्हा रोपांनी कणस धरली.

त्यामुळे दुष्काळाला आधार मिळाला आणि विसोबांची पुण्याई फळाला आली असा गावकऱ्यांचा समज झाला. मुक्ताबाईंचे ताटीचे अभंग आत्मसात केल्यावर त्यांनी शडूस्छळी (षड्स्थल) नावाचा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ रा.चिं. ढेरे यांना सोपानदेवांच्या समाधी मंदिरातील कागदपत्रांच्या गाठोड्यात मिळाला.खेचरी मुद्रेमुळे लाळेच्या प्रमाणात वाढ होऊन तहान भूक यावर नियंत्रण ठेवता येते. तेच नियंत्रण विसोबांनी आपल्या शरीरावर ठेवले होते. त्यामुळेच वीस-बावीस तास ते सहज अखंड समाधी अवस्थेत बसून राहात. तसे तर, ह्या खेचरी मुद्रेमळे साधक विषबाधा, रोग, मुर्च्छा, वार्धय, अकाली मृत्यू पासून मुक्त होतो. परंतु, विसोबा खेचरांनी सतत पांडुरंगाच्या धान्यासाठी ह्या विद्येचा उपयोग करून बार्शी येथे समाधी घेतली.'द्वादशीचे गावी जाहला उपदेश' असे नामदेवांनी गाथेत म्हंटले आहे. हठयोगी असणारे नाथपंथी विसोबा खेचर यांचे संपूर्ण वारकरी कुटुंबात खूप मोठे मानाचे स्थान आहे.

भारतातील आरोग्य कर्मचाऱ्यांना क्षयरोगाचा सर्वाधिक धोका

# संशोधनातून धक्कादायक माहिती उघड

नवी दिल्ली : भारतातील आरोग्य कर्मचाऱ्यांना क्षयरोगाचा सर्वाधिक धोका असल्याचे एका संशोधनात आढळून आले आहे. १० लाख कर्मचाऱ्यांमध्ये २ हजार ३९१ कर्माचाऱ्यांना रोगाची लागण होण्याची शक्यता असते, अशी धक्कादायक माहिती उघड झाली आहे.

दिल्लीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय महाविद्यालय, सफदरजंग रूग्णालय , मोरादाबाद येथील तीर्थंकर महावीर विद्यापीठतील डॉ. रविंद्रनाथ, डॉ. प्रणव ईश, डॉ. अनिंदा देभनाथ, डॉ.नितीन पवार, डॉ. अनिरबन भौमिक यांनी संशोधन केले.

**भारतातील क्षयरोगाचे आव्हान** –जगभरात क्षयरोग हे आरोग्य क्षेत्रापुढील एक मोठे आव्हान राहिले आहे. त्यातही भारतासारख्या मोठी लोकसंख्या असलेल्या देशात याचा खूप मोठा धोका निर्माण झाला आहे. जगभरातील क्षयरोगाची एक चतुर्थांश प्रकरणे येथे आढळतात. क्षयरोगाचा विषाणू 'मायकोबॅटेरिअम ट्युबरयूलॉसिस हा हवेद्वारे पसरतो. त्यामुळे कर्मचाऱ्यांना याची लागण फार लवकर होऊ शकते.

काय केले पाहिजे-रूग्णालयांमध्ये खेळती हवा नसणे, कोंदत वातावरण यामुळे देखील क्षयरोगाच्या फैलावाची तीव्रता वाढत असल्याचेही या संशोधनात नमूद करण्यात आले आहे. संसर्ग होणयाची शयता असूनही आरोग्य कर्माचाऱ्यांमध्ये हलगर्जीपणा दिसून येतो. मुखपट्टी न वापरणे, पीपीई किटचा वापर टाळणे, अशा प्रकारांचा त्यात समावेश होतो. आरोग्य कर्मचारी नेहमी क्षयरोगाने पीडीत गंभीर रूग्णांच्या सान्निध्यात येत असतात. याने धोका वाढतो. त्यामुळे या बेजबादारपणाला संशोधकांनी तातडीने पायबंद घालण्याचे सूचवले आहे. धोका असलेल्या आरोग्य कर्मचाऱ्यांची नियमित तपासणी, रोग्यांवर उपचार करताना घ्यावयाची काळजी याबद्दल जाणीवजागृती व प्रशिक्षण देणे असे उपाय सूचवण्यात आले आहेत. सकस आहार, मानसोपाचारांची उपलब्धता, कामाबाबतच्या ताणतणावाचे समायोजन, तसेच क्षयरोगाच्या रूग्णांसाठी विशिष्ठ दालनांची निर्मिती केल्याने आरोग्य कर्मचाऱ्यांमधीना क्षयरोगाच्या संसर्गावर मात करता येईल.

**राष्ट्रीय स्तरावरील मार्गदर्शक तत्वे**–यरोगाबर मात करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर काही मार्गदर्शक तत्वे जारी करण्यात आली आहेत, त्यात सुधारणा करणे आवश्यक असल्याचे हे संशोधन सांगते. संसर्गाची लागण होण्याची जास्त शयता असणारा समूहावर जास्त लक्ष दिले पाहिजे. आरोग्य क्षेत्रात कामाच्या ठिकाणी वातावरण निर्मितीसाठी मार्गदर्शक उपाययोजनांचा समावेश करावा.

भारताने २०२५ पर्यंत क्षयरोग निर्मूलनाचे लक्ष्य समोर ठेवले आहे. ते गाठत असताना आरोग्य कर्मचाऱ्यांच्या आरोग्याकडे मात्र दुर्लक्ष करून चालणार नाही. तसेच हा प्रश्न केवळ एका व्यवसायाशी संबंधित नाही.

**आरोग्य कर्मचाऱ्यांकडे दुर्लक्ष** –सर्वसाधारण व्यक्तिंच्या तुलनेत आरोग्य कर्मचाऱ्यांमध्ये क्षयरोगाचा तीन पट जास्त प्रादुर्भाव दिसून होतो. आरोग्य कर्मचाऱ्यांची याबाबतीत नोंदही ठेवली जात नाही ; किंवा ठेवली तरी तिच्यात खूप अनियमितता असते. या संशोधनासाठी २००४ ते २०२३ या कालावधीतील १० निरनिराळ्या अभ्यासांचे विश्लेषण करण्यात आले होते. त्यात आढळून आले की, रोगनिदान व चिकित्साप प्रयोगशाळेतील कर्मचारी सर्वात जास्त बाधित झाले आहेत. च्यानंतर डॉटर, व शेवटी परिचारक अशा उतरत्या क्रमान याचा फैलाव होतो.

# राशी भविष्य



१४ सप्टेंबर २०२४ (पीएसआय)

मेष : शुभ रंग: काळा, शुभ दिशा: उत्तर
कोणताही खर्च करताना ङ्गअंथरूण पांघरून पाहून पाय पसरावेफ हा सल्ला दिलेला महत्त्वाचा ठरेल.

वृषभ : शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : दक्षिण
देवापुढे मागितलेले मागणे प्रत्यक्षात मिळण्याच्या शक्यता चांगल्याच वाढतील. मुलांच्या मागण्या पूर्ण करता येतील.

मिथुन: शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पश्चिम
भावनिक नाती व्यवहारातही उपयोगी पडतील. यशाच्या शिखराकडे होणारी वाटचाल आपापल्या क्षेत्रात प्रसिद्धी देणारी ठरेल.

कर्क: शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : दक्षिण
अनुभवी व्यक्तीबरोबर होणारी उठबस आपल्या ज्ञानात भर टाकेल. नवीन काही शिकल्याचे समाधान मिळेल.

सिंह: शुभ रंग : केसरी, शुभ दिशा : दक्षिण
कुटुंबात कलह, आजारपण, किरकोळ अपघात इ.मुळे त्रासदायक प्रसंग येणे शक्य. आरोग्य सांभाळा.

कन्या: शुभ रंग: निळा,शुभ दिशा: दक्षिण
मोठेपणाच्या नावाखाली होणारा खर्च अवाक्याबाहेर जाणार नाही याची काळजी घ्या. मुलांकडे दुर्लक्ष नको.

तुळ : शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: उत्तर
शक्यतो ज्या निर्णयाचा दूरगामी परिणाम होणार आहे असे निर्णय शक्यतो पुढे ढकला.

वृश्चिक : शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:पूर्व
कामाच्या ठिकाणी आपल्याला न आवडणारे काम मिळाल्यामुळे कामातील उत्साह कमी होईल.

धनु: शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : पूर्व
परगावी जाण्याचे बेत व खाण्या-पिण्याची विविधता यामुळे वेळापत्रक बिघडणे शक्य. वेळोवेळी तज्ञांचा सल्ला घ्या.

मकर: शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: पूर्व
एखादा मोठा खर्च अनाठायी ठरणार नाही याची काळजी घ्या. कामात झालेला विलंब क्षम्य ठरणार नाही.

कुंभ : शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पश्चिम
महत्त्वाचे निर्णय, बैठका शक्यतो पुढे ढकला. कुटुंबियांसमवेत सिनेमा, नाटक पहाण्याचा बेत आखाल.

मीन : शुभ रंग : केसरी, अनुकूल दिशा : पूर्व
विशेष आदर दाखवून केलेले हट्ट त्या त्या व्यक्तीकडून पुरविले जातील. कुमारिकांच्या विवाहाचा प्रश्न सुटेल.

१४ सप्टेंबरला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर सुर्य, हर्षल व बुधाचा दुहेरी प्रभाव आहे. तुमची बुध्दी अतिशय तल्लख आहे. अनेक विषयात तिचा स्वैर संचार चालतो. त्यामुळे तुमचे व्यक्तिमत्व अष्टपैलू बनते. तुमचे विचार स्पष्ट असतात. ते इतरापर्यंत नेमक्या शब्दात पोचवण्याचे कसबही तुमच्या अंगी असते. नव्या ओळखी करून घेण्याची तुम्हाला आवड आहे. हास्यविनोद, चेष्टामस्करी यात तुम्ही रमता. प्रवास करणेही तुम्हाला आवडते. त्यामुळे तुमचे व्यक्तिमत्व संपन्न होऊन लेखनाला प्रेरणा मिळते. अर्थकारण, वाणिज्य, समाजकारण यातही तुम्ही ठसा उमटवता.

माणसाच्या जीवनात बुध्दिइतकेच भावनेलाही महत्व आहे याचे विस्मरण होऊ देऊ नका. अनेक विषयांच्या ज्ञानाबरोबर एका विषयाचा व्यासंग करून त्यात प्रभुत्व मिळवा. अति बौध्दिक श्रम, बैठे काम यामुळे पाठीचे, मज्जातंतूचे विकार जडतील. भुजंगासन, शलभासन गुणकारी ठरेल.

कार्यक्षेत्र : वर्तमानपत्रांच्या क्षेत्रात पुढे जाण्यास तुम्हास बराच वाव आहे. पत्रकारिता किंवा वितरणव्यवस्था, विक्री यात आपल्या बुध्दीचा ठसा उमटवाल. शब्दप्रभुत्वामुळे जाहिरातक्षेत्रही काबीज करता येईल. प्रसिध्दीप्रमुख किंवा जनसंपर्क आधिकारी अशी महत्वाची पदे भूषवाल. वाणिज्य, अर्थकारण, बँकिंग, आयकर, विक्रीकर या खात्यात सहजगत्या प्रवेश मिळेल. अकाऊंट, करसल्लागार म्हणून काम करतांना लौकिक वाढेल.

प्रणयी जीवन : आपला जोडीदार दिसायला अत्यंत देखणा असलाच पाहिजे अशी तुमची अजिबात अपेक्षा नसते. त्याच्या रूपापेक्षा तुम्ही त्याच्या बौध्दिक पातळीला महत्व देता. त्याचे अवांतर वाचन, स्वतंत्र विचार करण्याची क्षमता तुम्हाला महत्वाच्या वाटतात. एप्रिल २१ ते मे २० मधील व्यक्ती टाळा. तुमच्याशी सुसंवाद साधू शकणाऱ्या व्यक्ती मे २१ ते जून २० दरम्यान जन्मलेल्या असतील.

वर्षफळ : उच्च शिक्षणाची, प्रशिक्षणाची संधी चालून येईल. नव्या ध्येयधोरणांच्या आखणीत महत्वाचा सहभाग राहील. ऑक्टोबर नोव्हेंबर मध्ये देवघेवीचे व्यवहार सलोख्याने पूर्ण होतील. डिसेंबर जानेवारी मध्ये विरोधकांमुळे स्थैर्याला धोका पोहोचेल. फेब्रुवारी मार्च मध्ये जिवलगाचा सहवास नवी स्फूर्ती देऊन जाईल. एप्रिल मे मध्ये विनासायास धनप्राप्तीचे योग येतील. जुलै ऑगस्ट मध्ये शासकीय कामांना झपाट्याने गती मिळेल.

महत्वाचे वर्ष : ५, १४, २३, ३२, ४१, ५०, ५९, ६८. भाग्यरत्न : पाचूयाच तारेखेची व्यक्ती : न्यालचंद शाह, रॉबिन सिंग

# मशरूमचे हे फायदे वाचून तुम्ही लगेचच खाण्यास कराल सुरूवात

मुंबई: काही जणांना मशरूम खायला आवडत नाही. तुमचेही उत्तर जर हा असे आहे तर याचे एकदा फायदे जाणून घ्या थंडीच्या दिवसांत अनेक आजार आपल्या अवतीभवती असतात. अशातच आपले डाएट योग्य ठेवणे गरजेचे असते. या बदलत्या वातावरणाशी लढण्यासाठी आपण निरोगी असणे गरजेचे असते. अशातच मशरूम ही अशी गोष्ट आहे जी तुमच्या शरीराला अनेक फायदे मिळवून देते. मशरूम आपल्या आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर आहेत. हे तुम्ही सॅलड, सँडविच, पिझ्झा, मिक्स व्हेज, मंच्युरियन म्हणून खाऊ शकता.

व्हिटामिन डी मोठ्या प्रमाणात

व्यस्त वेळापत्रकामुळे अनेकांना उन्हात बसायला वेळ मिळत नाही. त्यामुळे व्हिटामिन डीची कमतरता होते. अशातच तुम्ही व्हिटामिन डीची कमतरता भरून काढण्यासाठी मशरूमचे सेवन करू शकता.

पोषकतत्वांनी भरपूर

मशरूममध्ये व्हिटामिन डी, बी, सेलेनियम, पोटॅशियम आणि कॉपर मोठ्या प्रमाणात असते. हे व्हिटामिन्स शरीराल विविध आजारांशी लढण्यास मदत करतात. सोबतच आरोग्य चांगले राखतात.

इम्युनिटी वाढते

मशरूममध्ये बायोॲक्टिव्ह कंपाऊंड मोठ्या प्रमाणात असतात जे इम्युनिटी वाढवण्यास मदत करतात. यात बीटा ग्लुकेन नावाचे तत्व असते जे थंडीत येणाऱ्या सर्दी तापासासाठी तसेच इन्फेक्शनविरोधात लढण्यास मदत करते.

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे**, संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** ईमेल : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com




# शाहरुख खानच्या पठाणच्या झूमे जो पठाणने रचला इतिहास, यूट्यूबवर पाहिला गेला १०० कोटी वेळा

मुंबई-शाहरुख खान आणि त्याचे चित्रपट एकापाठोपाठ एक रेकॉर्ड तोडताना दिसत आहेत. गेल्या वर्षी जेव्हा शाहरुख 'पठाण' सिनेमातून बॉक्स ऑफिसवर आला, तेव्हा त्याच्या कमबॅकने इंडस्ट्रीला हादरवून सोडले. या अभिनेत्याच्या चित्रपटाने १००० कोटींचा मोठा व्यवसाय करून थेट निर्मात्यांना श्रीमंत केले. २०२३ हे वर्ष शाहरुखसाठी खूप खास ठरले. 'पठाण' नंतर त्याने बॉक्स ऑफिसवर ११०० कोटींचा 'जवान'ही रिलीज केला. दरम्यान, शाहरुख आणखी एक मोठा विक्रम आपल्या नावावर करत आहे.



खरं तर, २०२३ मधील सर्वात ट्रेंडिंग गाण्यांपैकी एक, गेल्या वर्षीच्या मेगा-ब्लॉकबस्टर चित्रपट 'पठाण' मधील 'झूमे जो पठाण' या गाण्याने यूट्यूबवर एक अब्ज व्ह्यूज ओलांडले आहेत म्हणजेच ते १०० कोटी वेळा पाहिले गेले आहे. शाहरुखच्या चित्रपटातील हे दुसरे गाणे आहे, ज्याने हे मोठे यश संपादन केले आहे. अरिजित सिंग, सुकृती कक्कर, विशाल आणि शेखर यांनी हे गाणे गायले आहे आणि संगीतबद्ध केले आहे. शाहरुखच्या 'पठाण' मधील 'झूमे जो पठाण' हे गाणे २२ डिसेंबर २०२२ रोजी यशराज फिल्म्सच्या यूट्यूब चॅनलवर प्रदर्शित झाले होते. तर हा चित्रपट जानेवारी २०२३ मध्ये थिएटरमध्ये प्रदर्शित झाला होता.'झुमे जो पठाण' रिलीज होताच सोशल मीडियावर ट्रेंड होऊ लागला आणि चार्टबस्टर बनला. या गाण्यावर स्टार्स आणि सोशल मीडियावर प्रभाव टाकणाऱ्यांनीही अनेक रिल्स बनवले होते. या गाण्यात शाहरुख खान आणि दीपिका पादुकोणची जबरदस्त केमिस्ट्री पाहायला मिळाली. बॉस्को सीझरने हे गाणे कोरिओग्राफ केले आहे. शाहरुख खानचे हे दुसरे गाणे आहे जे एक अब्ज वेळा पाहिले गेले आहे. यापूर्वी शाहरुख खान आणि अनुष्का शर्मा यांच्या 'रब ने बना दी जोडी' या चित्रपटातील 'तुझमे रब दिखता है' हे गाणे १०० कोटी वेळा पाहिले गेले होते.

जर आपण एकंदर बोललो तर 'झूमे जो पठाण' हा भ्दल्ऊलं वर १ अब्ज व्ह्यूज मिळवणारा २१ वा भारतीय संगीत व्हिडिओ आहे. हनुमान चालिसा ४ अब्ज पेक्षा जास्त व्ह्यूजसह सर्वाधिक पाहिलेला व्हिडिओ आहे. भ्दल्ऊलं वर २+ अब्ज व्ह्यूज असलेला हा एकमेव भारतीय व्हिडिओ आहे. शाहरुख खानच्या 'पठाण' चित्रपटाचे दिग्दर्शन सिद्धार्थ आनंदने केले होते आणि यशराज फिल्म्सची निर्मिती होती. शाहरुख-दीपिकाशिवाय जॉन अब्राहमने खलनायकाची भूमिका साकारली होती. हिंदी चित्रपटांच्या इतिहासात 'पठाण' हा जगभरात १००० कोटींची कमाई करणारा दुसरा चित्रपट आहे.शाहरुख खानच्या नावावर अनेक मोठे रेकॉर्ड आहेत. त्याचा 'जवान' हा हिंदी चित्रपटसृष्टीतील सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट आहे. एवढेच नाही तर शाहरुख खानच्या आगामी चित्रपटांवर कोट्यवधी रुपये लावले आहेत. 'टायगर व्हर्सेस पठाण' आणि 'किंग'च्या माध्यमातून शाहरुख स्वत:चाच विक्रम मोडू शकतो, असे मानले जात आहे.

# अक्षय कुमार स्टार भूत बंगलामध्ये हे ३ स्टार्स करेल एन्ट्री, ब्लॉकबस्टरची प्रतीक्षा संपणार?

मुंबई-अभिनेता अक्षय कुमारने ९ सप्टेंबर रोजी, त्याच्या ५७ व्या वाढदिवशी 'भूत बंगला' या नवीन चित्रपटाची घोषणा करून चाहत्यांना एक भेट दिली होती. 'भूत बंगला' या हॉरर कॉमेडी चित्रपटाचे दिग्दर्शन प्रियदर्शन करत आहे. यापूर्वी प्रियदर्शननं अक्षय कुमारबरोबर 'भूल भुलैया' (२००७) हा ब्लॉकबस्टर चित्रपट दिला होता. अक्षय आणि प्रियदर्शन आता १४ वर्षांनंतर पुन्हा एकदा धमाका करण्यासाठी बॉक्स ऑफिसवर येत आहेत. दरम्यान 'भूत बंगला' चित्रपटातील उर्वरित स्टारकास्टची नावे समोर आली आहेत. या चित्रपटात कोणते स्टार्स एन्ट्री करेल आहे, याबद्दल आता आम्ही तुम्हाला सांगणार आहोत.



'हे' स्टार्स करणार एन्ट्री : 'भूत बंगला' चित्रपटात प्रवेश करण्याऱ्या या स्टार्सनी आपल्या कॉमेडीनं अनेक चित्रपट 'ब्लॉकबस्टर' दिले आहेत. या तिन्ही स्टार्सने अक्षय कुमारबरोबर काम केलं आहे. या कलाकारांची नाव परेश रावल, राजपाल यादव आणि असरानी आहेत. अक्षय कुमारबरोबर कॉमेडी चित्रपटांचे हे त्रिकूट 'भूल भुलैया', 'हेरा फेरी' आणि 'गरम मसाला' या चित्रपटांमध्येही दिसले आहे. या तिन्ही नावांची निर्मात्यांनी अद्याप पुष्टी केलेली नाही. आता सोशल मीडियावर 'भूत बंगला' हा चित्रपट हिट होणार, याची खात्री अनेकजण देत आहेत. सोशल मीडियावर सध्या या त्रयीबद्दल चर्चा होताना दिसत आहेत.

चाहत्यांच्या प्रतिक्रिया : या चित्रपटाबाबत एका चाहत्याने लिहिले - अक्षय आणि या त्रिकुटाचा कोणताही चित्रपट फ्लॉप नाही, 'भूत बंगला' हिट होईल. दुसऱ्या एका युजरनं लिहिलं की - बऱ्याच दिवसांनी या सर्वांना एकत्र पाहण्याची संधी मिळणार आहे. आणखी एका यूजरनं लिहिलं की - 'भूत बंगला' चित्रपट 'भूल भुलैया'पेक्षाही मोठा हिट ठरू शकतो. 'भूत बंगला' पुढील वर्षी २०२५ मध्ये रुपेरी पडद्यावर प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाची रिलीज डेट सध्या समोर आलेली नाही. 'भूत बंगला' चित्रपटाची निर्मिती बालाजी टेलिफिल्म्स आणि केप ऑफ गुड्स फिल्म्स यांनी संयुक्तपणे केली आहे. या चित्रपटाच्या निर्मात्या एकता कपूर आणि शोभा कपूर आहेत.

# बायो डाटा तयार करताना या दोन चुका करु नका; नाहीतर हातातून नोकरी गेलीच म्हणून समजा!



तुम्ही जर नोकरीसाठी अर्ज करण्याचा विचार करत असाल तर सर्वप्रथम तुम्हाला तुमचा रेझ्युमे एचआर विभागाकडे पाठवावा लागतो. हल्ली तरुणाई विचार न करता रिझ्युमे तयार करून नोकरीसाठी अर्ज करताना दिसतात. एकदा रेझ्युमे तयार केला की तो पुन्हा वाचणे त्याला आवश्यक वाटत नाही, ज्याचा थेट परिणाम त्याच्या नोकरीवर होतो. आज आम्ही तुम्हाला रेझ्युमेमधील त्या दोन चुकांबद्दल सांगणार आहोत, ज्या अनेकदा नोकरीसाठी अर्ज करणाऱ्या तरुणांकडून केल्या जातात. हे पाहून उमेदवाराने अर्ज करण्यापूर्वी कोणतीही तयारी केलेली नाही, हे मुलाखतकाराला समजते. जाणून या दोन चुका कोणत्या? पाहुयात... महत्वाचीच माहिती लिहा!

कुठल्याही कंपनीला कामासाठी चांगल्या कर्मचाऱ्याची गरज असते. त्यामुळे रेझ्युमेमध्ये त्या गोष्टी लिहा, ज्या आवश्यक आहेत. अनेकदा उमेदवार रिझ्युमेमध्ये अधिक माहिती टाकतात. अनेकद आपण अनावश्यक माहिती त्यात टाकतो. त्यामुळे रेझ्युमे प्रभावी दिसत नाही. आपल्याला ज्या पदासाठी रेझ्युमे पाठवायचा आहे. त्या पदासाठी आवश्यक असणारी माहिती रेझ्युमेमध्ये आवर्जून द्यावी. शिवाय काही खब ज्दग्हू देखील हायलाईट करायला विसरु नका. त्यासोबतच तुमचा रेझ्युमे २ पानांपेक्षा जास्त नसावा.


जास्त स्टायलिश रिझ्युमे तयार करु नका!

सध्या रेझ्युमे तयार करण्यासाठी अनेक बेवसाईट्स उपलब्ध आहेत. त्यातील विविध प्रकारचे टेम्लेट्स वापरुन अनेकजण रेझ्युमे तयार करतात. सगळं रेडिमेट मिळत असल्याने त्यातलीच एखादी चांगली डिझाईन वापरुन अनेकजण रेझ्युमे तयार करतात. यात वेगळं आणि चांगलं रेझ्युमे तयार करण्याच्या नादात आपण स्टायलिश रेझ्युमे तयार करतात. मात्र तुमच्या स्किल्समध्ये कंपनीला इंट्रेस्ट असतो. तुम्ही डिझाईन केलेल्या रेझ्युमेमध्ये कंपनीला इंट्रेस्ट नसतो. त्यामुळे रेझ्युमे तयार करताना वाचायला सोपा असा फॉन्ट निवडण्याचा सल्ला दिला जातो. जेवढा साधा, सोपा , सरळी रिझ्युमे तयार कराल तेवढं चांगलं राहिलं.

विविध ॲप्स आणि वेबसाईट्स उपलब्ध कॅनव्हा सारख्या अनेक वेबसाईट्स उपलब्ध आहेत. ज्यात आपण अगदी प्रोफेशनल रेझ्युमे तयार करु शकतो किंवा रेझ्युमे तयार करण्यासाठी वेगवेगळे अघ टूल्सदेखील उपलब्ध असतात. यातदेखील तुम्ही चांगले रेझ्युमे तयार करु शकता. फक्त रेझ्युमे तयार करताना साधा आणि नीटनेटका असायला हवा एवढं नक्की.

# या ५ सवयींमुळे कमी होतात पुरुषांचा स्पर्म काऊंट, हे आहे त्यावर रामबाण उपाय

प्रेम, लग्न आणि नंतर मुलं बाळ हा साधारण समाजातील एक भाग आहे. लग्न झालं की आई वडील होणं हे आपल्या आयुष्यातील एक महत्त्वाचा टप्पा असतो. बाळ होण्यासाठी स्त्री आणि पुरुष या दोघांचे आरोग्य योग्य हवं. शरीरसंबंध ठेवणं म्हणजेच सेक्स करणं हे मानवी जीवनाचा एक भाग आहे. याच लैंगिक संबंधांतून मुलं जन्माला येतात. आई होण्यासाठी महिलाचं परिपक्व गर्भ, फर्टिलिटीचं प्रमाण, नियमित मासिक पाळी या गोष्टी महत्त्वाच्या असतात. तसंच पुरुषांसाठी शुक्राणूंची संख्या महत्त्वाची असते. एका अभ्यासात धक्कादायक खुलासा समोर आला आहे. ज्यात आजच्या पुरुषांची प्रजनन क्षमता झपाट्याने कमी होत असल्याचे समोर आलंय. ज्याचं कारण शुक्राणूंची संख्या कमी असणे आहे. या मागे तुम्हाला असणारी वाईट सवयी. जर तुम्हालाही या सवयी असतील तर वेळीच सावध व्हा.



धुम्रपान

जे पुरुष मोठ्या प्रमाणात धुम्रपान करतात त्यांना स्पर्म काऊंट कमी होण्याची समस्या उद्भवू शकते.

तणाव

ऑफिसचा वाढलेला तणावामुळे तुमच्या शुक्राणूंची संख्या कमी करु शकतात. सतत तणावात राहणं, कमी झोपणं, सतत टेन्शनमध्ये राहणं यामुळे तुमचा स्पर्म काऊंट कमी होतो.

व्यायामाचा अभाव

तासंतास खुर्चीवर बसून काम, त्यात व्यायामाचा अभाव...यामुळे पुरुषांमध्ये लठ्ठपणाची समस्या जाणवते. तज्ज्ञांच्या मते लठ्ठपणामुळे शुक्राणूंची संख्या कमी होते. जर पुरुषांना त्यांचं सेक्स लाइफ चांगलं हवं असेल तर दररोज व्यायाम करणं गरजेचं आहे.

रात्री उशिरा झोपणं

रात्री उशिरा झोपल्यामुळे तणाव आणि लठ्ठपणाची समस्या वाढते. ज्यामुळे शुक्राणूंची संख्या कमी होऊ शकते. इतकंच नाही, तर रात्री उशिरापर्यंत जागरण केल्याने तुमची रोगप्रतिकारशक्तीही कमकुवत होते.

पॅन्टच्या खिशात मोबाईल ठेवणे

पुरुषांनी आपला मोबाईल पँटच्या खिशात ठेवल्याने शुक्राणूंची संख्या कमी होते, असं एका अभ्यासात समोर आलं आहे. कारण मोबाईल फोनमधून निघणाऱ्या रेंजचा शुक्राणूंवर वाईट परिणाम होतो.

शुक्राणूंची संख्या वेगाने वाढेल

व्हिटॅमिन डीयुक्त पदार्थांचं सेवन

शुक्राणूंची संख्या वाढविण्यासाठी व्हिटॅमिन डीयुक्त पदार्थांचे सेवन करा. हे एक उत्तेजक आहे जे टेस्टोस्टेरॉनची पातळी वाढवण्याचं काम करते.

अश्वगंधा


पुरुषांसाठी अश्वगंधा खूप फायदा होतो. हे एक सर्वोत्तम नैसर्गिक औषध आहे. दररोज पाच ग्रॅम अश्वगंधा सेवन केल्याने शुक्राणूंची संख्या वाढण्यास मदत होते.

शिलाजीत

हे दुसरं एक औषध आहे, ज्यामुळे नपुंसकत्व टाळण्यासाठी उत्तम सप्लिमेंट आहे. जर तुमच्या शुक्राणूंची संख्या कमी होत असेल, तर शिलाजीतचे दिवसा सेवन करणे तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकते.

झिंक-झिंक पुरुषांमध्ये शुक्राणूंची संख्या वाढविण्यास खूप फायदेशीर आहे. म्हणूनच स्त्रियांपेक्षा पुरुषांना त्याची जास्त गरज असते. झिंक हे पुरुषांच्या लैंगिक, प्रोस्टेट आणि टेस्टोस्टेरॉनच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे.

# यशवंत महाशब्दकोडे



आडवे शब्द

१. व्याकूळ, घाबरलेला
५. असामान्य
८. पान (सं.)
९. दृष्ट
१०. 'पुरी'चे दैवत
१२. मोठा नगारा
१३. नवरदेव
१४. व्याख्यान
१५. रेशमचा किडा
१६. अंदाज, तर्क
१८. राबता, जाणे-येणे
२०. प्रमाणपत्र
२२. मच्छर
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. पल्लवीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका
२७. धमकी, श्वास
३०. व्यवस्थित
३२. अखबार
३३. कासंडी, दुधाची घागर
३४. हाताचा एक अवयव
३६. व्यवस्था
३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम
४०. जहाजांचा मुक्काम
४१. फळातील द्रव
४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड
४३. पंगत
४५. दरोडा
४७. अपशकुन
५०. नकला करणारा
५२. हिशोबाची एक बाजू
५४. यात्रेत नियमित जाणारा
५६. दुधाच्या वड्या
५८. शेजारी शेजारी
६०. झकास
६१. एक मंगलवाद्य
६३. निवासस्थान
६४. समोरसमोरची चकमक
६५. पूर्णपणे
६७. एक सुगंधी वनस्पती
६८. समुद्र
७०. रमणीय
७१. असुर, दानव, देवांचा शत्रू
७२. गाजावाजा
७३. किंमत, पैसा
७४. विशेष
७५. चंद्र
७६. निकट, जवळ
७८. भूकंप
८०. मलई
८१. फरक
८२. घराणे
८३. रंग बदलणारा प्राणी

उभे शब्द

१. यजमानीण
२. पहारेकरी
३. कलंक
४. सुकुमार
५. न थांबता
६. धैर्य
७. दारूचा एक प्रकार
८. उद्याच्या नंतरचा दिवस
११. गर्दीचा विळखा
१३. भावाची पत्नी
१५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते!
१७. धार्मिक पर्यटन
१८. महिला, बाई
१९. प्रफुल्लित
२१. पटपट, वेळ न दवडता
२३. मानसिक धक्का (हिंदी)
२६. वस्तूचा छोटा तुकडा
२८. समोरच्याच्या मनातील विचार आ-ळखणारा
२९. वार्ताहर
३०. पाणी
३१. आई-वडील
३३. सूत काढण्याचे एक साधन
३५. आरोळी, ललकारी
३७. जिव्हा
३९. मळलेले
४०. आपला नसलेला
४४. अरण्य
४६. अंजन
४८. चेष्टेखोर
४९. न वापरलेली, नवी
५१. दुलई
५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली
५५. लेखणी
५६. भिऊन पळ काढणारा
५७. भटकणारा
५९. आशीर्वाद
६१. माळ, हार
६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा
६४. तुलनेतील सारखेपणा
६५. अनुत्तीर्ण
६७. चर्चा
६८. लाकडाची उत्कृष्ट जात
६९. रानरेडा
७०. सुंदर तरुणी
७३. दरवाजा
७४. मृत्तिकापात्र
७५. सुविधा
७७. मगज
७८. द्रव्य
७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा

कोडे क्र.६ चे उत्तर

आडवे उत्तर

१.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.सामना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा

उभे उत्तर-१.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ ४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५३.माजघर ५५.कलम ५६.पळपुटा ५७.रमताराम ५९.वर ६१.सर ६२.नवागत ६४.साम्य ६५.नापास ६७.मसलत ६८.सागवान ६९.गवा ७०.रमणी ७३.दार ७४.खापर ७५.सोय ७७.गर ७८.धन ७९.कंस

# राजकारणात येऊन पॉलिसी लेवलवर बदल घडविता येतात

## एमआयटी डब्ल्यूपीयूत मिटसॉगच्या २० व्या बॅचचा शुभारंभ

पुणे, दि: १३ सप्टेंबर: राजकारणात येतांना सरकार आणि प्रशासन समजावून घ्यावे , न्याय संस्थाचे ज्ञान असावे, शिक्षण व्यवस्था, सांस्कृतिक बदल, जनतेपासून ज्ञान मिळवावे, ऐकण्याची सवय ठेवावी आणि लेजिलेटीव्ह टुल्स सारखे गुण अंगीकारावे. तसेच समाजाचे कल्याण साधण्यासाठी राजकारणात येऊन पॉलिसी लेवलवर बदल घडविता येतात. असे उदगार महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. निलम गोर्हे यांनी व्यक्त केले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हिर्सिटीच्या एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंटच्यावतीने आयोजित मास्टर्स इन पॉलिटिकल लिडरशीप अँड गव्हर्नमेंट (एमपीजी) २० व्या बॅच च्या शुभारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून त्या बोलत होत्या.

यावेळी पंजाब विधानसभेचे सभापती कुलतार सिंह संधवान व राजस्थान विधानसभेचे माजी सभापती डॉ. सी.पी.जोशी विशेष सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ.विश्वनाथ दा. कराड होते.

तसेच एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंटचे संस्थापक व डब्ल्यूपीयूचे कार्याध्यक्ष राहुल कराड, कुलगुरू डॉ. आर.एम. चिटणीस, मिटसॉगचे संचालक डॉ. के. गिरीसन, प्रा. डॉ. परिमल माया सुधाकर व श्रीधर पब्बीशेट्टी हे उपस्थित होते.

यावेळी नॅशनल लॅजिलेटिव्ह कॉन्फरन्सच्या कॉपी टेबल बुकचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

डॉ. निलम गोर्हे म्हणाल्या, राजकारणात उतरल्यावर संसदीय कामकाज, वैयक्तिक, सामाजिक, आर्थिक आणि जीवनासंदर्भातील अधिकार व आत्मविश्वास मिळतोहा धागा सर्वांना जोडणार आहे. मानवधिकार संदर्भातील माहिती घ्यावी. देशात आज ही जाती आणि वर्ण भेद आहे त्यातून बाहेर निघण्यासाठी युवकांनी कार्य करावे. बदलत्या राजकारणामुळे खाजगी आणि सार्वजनीक जीवन राहिलेले नाही याचे भान ठेवावे.

कुलतार सिंह संधवान म्हणाले, सेवा परमोधर्म हे सूत्र लक्षात ठेऊन राजकारणाच्या



मैदानात उतरावे. जनतेच्या सेवेतूनच सामाजिक समस्या सोडविता येतात. जेव्हा समाजातील प्रत्येक व्यक्तीचा विकास होईल तेव्हाच भारत विश्वगुरू बनेल. समाजावर राजकारणाचा सर्वात जास्त प्रभाव पडतो. या क्षेत्रात येतांना मानव सेवा निःस्वार्थ भावनेने करावी. विचार आणि तलवाराने इतिहास लिहिला जातो. या देशात विविध धर्मांचे लोक असल्याने धर्म विरोधक गोष्टींना कधीही वाव देऊ नका. देशातील संसदेमध्ये किंवा विधानसभेमध्ये कायदे पास होतात त्यावर चर्चा विमर्श होत नाही. त्यामुळे असे आमदार आणि खासदार निर्माण व्हावे जे यावर बोलतील.

डॉ.सी.पी जोशी म्हणाल्या देशात औद्योगिक क्रांती नंतर सूचना क्रांती ही सर्वात मोठी होती. येथील उच्च शिक्षण जरी गुणवत्तापूर्ण असले तरी प्राथमिक शिक्षण व्यवस्थेत मोठी सुधारणेची अपेक्षा आहे. विषम समाजाला एकत्रित आणण्यासाठी राजकारणी मंडळींचे काम आहे. त्याच नुसार प्रत्येक युवकांमधील स्कीलचा वापर मोठ्या प्रमाणात करावा. स्वातंत्र्यपूर्व काळात या देशाचे ज्यांनी नेतृत्व केले ते सर्व बाहेर देशातून उच्च शिक्षण घेऊन आले होते. त्यामुळे आता राजकारण क्षेत्रात योग्य प्रशिक्षणाची गरज आहे. देशात शिक्षित युवा वोटर असल्यास शिक्षक राजकारण येतील.

प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, भारतीय संस्कृती, तत्वज्ञान आणि परंपरेचे पालन करून मानव सेवेला महत्व दयावे. वसुधैव कुटुम्ब कमची संकल्पना राबविण्यासाठी हिंदू राष्ट्राची नाही तर हिंदवी स्वराज्याची स्थापना करणे गरजेचे आहे. देशाच्या पहिल्या पंतप्रधान पदाची शपथ घेतांना पं. नेहरू यांनी सांगितले होते की मे देशाचा सेवक आहे. अशी भावना ठेऊन प्रत्येकाने कार्य करावे. राहुल विश्वनाथ कराड म्हणाले,राजकारणात सुशिक्षित व चांगल्या लोकांनी येणे गरजेचे आहे. देशाची वाढती लोकसंख्या संदर्भात कोणतीही पार्टी विचार करीत नाही. अशा वेळेस राजकारणी मंडळांनी प्रशिक्षण घेतले तर देशाची ब्यूरोक्रॉसी व स्थिती सुधरण्यास वेळ लागणार नाही. त्याच प्रमाणे देशातील कोणत्याही निवडणुकीच्या १ वर्षापूर्वी कोणतीही योजना घोषित करू नये. त्याच प्रमाणे हा पाठ्यक्रम देशातील सर्व विधानसभा व विधान परिषदेत सुरू करण्याची गरज आहे.

यावेळी डॉ. आर.एम. चिटणीस यांनी विचार मांडले डॉ. परिमल माया सुधाकर यांनी मिटसॉगच्या स्थापनेची पार्श्वभूमी सांगितली. यावेळी विद्यार्थी संस्कृती ढोलमा आणि ध्रुव सावजी यांनी विचार मांडले प्रा.डॉ. गौतम बापट यांनी सूत्रसंचालन केले.

## आरटीई प्रवेशापासून वंचित ठेवणाऱ्या गट शिक्षणाधिकाऱ्यांना उच्च न्यायालयाने ठोठावला दंड

धाराशिव (प्रतिनिधी) - शासनाच्या राईट टू एज्युकेशन म्हणजेच शिक्षणाचा अधिकार (आरटीई) प्रक्रियेत निवड झालेल्या २२ विद्यार्थ्यांना निवड यादी प्रमाणे पात्र करून पंधरा दिवसांनी अपात्र करून त्यांच्या जागी उत्पन्न कर भरणाऱ्या पालकांच्या पाल्यांना प्रवेश देण्याचे अवैध काम पडताळणी समिती व इंग्रजी माध्यमांच्या शाळा चालकांनी केले होते. याबाबत जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडे दाद मागितली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे देऊन त्याकडे अक्षम्य दुर्लक्ष केले. त्यामुळे संबंधित अन्यायग्रस्त विद्यार्थ्यांच्या पालकांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात शिवसेनेचे धाराशिव शहर संघटक प्रशांत उर्फ बापू साळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली धाव घेतली. न्यायालयाने दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेत त्या विद्यार्थ्यांना पुन्हा पूर्ववत प्रवेश देण्यात यावेत असे आदेश दिले. तर प्राथमिक शिक्षणाधिकारी व गट शिक्षणाधिकारी यांना प्रत्येकी ७५०० रुपयांच्या दंडाची शिक्षा ठोठावली. ती दंडाची रक्कम याचिकाकर्त्यांना दि. ३० सप्टेंबर पूर्वी त्यांच्या पगाराच्या अकाउंटमधून द्यावी, असे आदेश दि.५ सप्टेंबर रोजी दिले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना न्याय मिळाला असून शिक्षण विभागाच्या भोंगळ कारभाराचे वाभाडे निघाले आहे.

धाराशिव जिल्ह्यात इंग्लिश मिडीयमच्या शाळेमध्ये २५ टक्के विधवा महिला, अनाथ बालके, दिव्यांग, एससी, एसटी, ओबीसी अशा घटकांतील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची खास तरतूद करण्यात आली आहे. मात्र प्रवेशास पात्र असलेल्या २२ विद्यार्थ्यांना प्रवेशापासून वंचित ठेवण्याचे काम जाणून बुजून केले. त्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांच्या पालकांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे धाव घेतली. त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी व तक्रारदार पालकांची बैठक घेऊन या प्रकरणात तातडीने योग्य ती कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. मात्र, पुढे कोणतीही कार्यवाही केली नाही. या प्रक्रियेत संगणकावर व्यवस्थित माहिती दिसत नसल्याचे कारण देत प्रवेश देण्यास त्यांना टाळाटाळ केली. या प्रवेश प्रक्रियेचे खापर संगणकावर फोडून शिक्षण विभागाचे अधिकाऱ्यांनी हात वर केले.

## शारदा इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांची राज्य स्पर्धेसाठी निवड

**लातूर / प्रतिनिधी-** लातूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने १४ वर्षीय वयोगट शालेय विभागीयस्तरीय जिम्नॅस्टिक स्पर्धा नुकत्याच नांदेडच्या क्रीडा संकुलावर झाल्या. यात लातूरच्या शारदा इंटरनॅशनल स्कूलच्या १४ वर्षे वयोगटातील मुलांच्या संघाने सहभाग नोंदवला होता. त्यात इयत्ता सहावीच्या प्रज्ञेश सुरवसे याने प्रथम क्रमांक पटकावला. त्याची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या यशाबद्दल रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील, उपाध्यक्ष एल. एम. पाटील, संस्थेचे अन्य संचालक, प्राचार्य दत्ता घारगे, उपप्राचार्य विलास गायकवाड, शिक्षिका शीला शेळके, वैशाली गिरवलकर, क्रीडा विभाग प्रमुख विजय जाधव, ज्योती पवार यांच्यासह सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या खेळाडूचे कौतुक केले आहे.

## पंजाबमधील खलिस्तान्यांवर एनआयएचे छापे

अमृतसर : एनआयएने खलिस्तानी विरोधात मोठी कारवाई सुरू केली असून पंजाबमध्ये अनेक ठिकाणी धाड टाकण्यात आली आहे. मोंगा, अमृतसर, गुरुदासपूर, जालंधर आणि इतर भागात १४ ठिकाणी छापे टाकण्यात आले. गेल्या वर्षी लंडनमधील भारतीय उच्चायुक्तालयावर झालेल्या हल्ल्याप्रकरणी एनआयएने मोठी कारवाई केली आहे. लंडन हल्ल्याप्रकरणी एनआयएच्या तपासात महत्त्वाच्या घडामोडी समोर आल्या आहेत. यापूर्वी ५ सप्टेंबर रोजी एनआयएने अफगाण वंशाच्या यूके नागरिक इंदरपाल सिंह गाबाविरुद्ध आरोपपत्र दाखल केले होते. गाबा यांच्यावर गेल्या वर्षी २२ मार्च रोजी भारतीय उच्चायुक्तालयाबाहेर भारतविरोधी आंदोलनात भाग घेतल्याचा आरोप आहे.

२५ एप्रिल रोजी अटक करण्यात आलेल्या इंदरपाल सिंह गाबाला यापूर्वी डिसेंबर २०२३ मध्ये लंडनहून पाकिस्तानमार्गे आल्यावर इमिग्रेशन अधिका-यांनी ताब्यात घेतले होते. गाबा यांनी आंदोलनात भाग घेऊन फुटीरतावादी अजेंड्याला पाठिंबा दिल्याचा आरोप आरोपपत्रात करण्यात आला आहे. अमृतपाल सिंह आणि त्याची संघटना वारिस पंजाब दे यांच्या विरोधात सुरू असलेल्या कारवाईवर प्रभाव पाडणे हा त्याचा उद्देश होता.

भारतीय उच्चायुक्तालयावरील हल्ला हा खलिस्तानी कारण पुढे करण्याच्या मोठ्या रणनीतीचा भाग होता, अस एनआयएच्या तपासात पुढे आले आहे. लंडनचा हल्ला पंजाब पोलिसांनी अमृतपाल सिंह विरुद्ध केलेल्या कारवाईला प्रत्युत्तर म्हणून करण्यात आला होता, यांचा खलिस्तानचा अजेंडा असल्याचा खुलासा झाला आहे.

गेल्या वर्षी मार्चमध्ये खलिस्तान समर्थकांनी ब्रिटनमधील भारतीय उच्चायुक्तालयाबाहेर गोंधळ घातला होता. निदर्शनादरम्यान अमृतपाल सिंह यांच्या पोस्टर्ससह खलिस्तानच्या समर्थनार्थ घोषणाबाजी केली. यावेळी फ्री अमृतपाल सिंहफ, वीवाँट जस्टिस आणि वीस्टँडविथ अमृतपालसिंह अशा घोषणाही देण्यात आल्या. या घटनेचे अनेक व्हीडीओही सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत.

## डॉ. दिलीप नागरगोजे यांचा रोटरी च्या वतीने शिक्षक गौरव पुरस्काराने सन्मान



लातूर / प्रतिनिधी- रोटरी सॅटेलाइट क्लब ऑफ लातूर अस्पिरेशन च्या वतीने दयानंद कला महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ चा शिक्षक गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

डॉ नागरगोजे हे १९९५ पासून दयानंद कला महाविद्यालयात तत्त्वज्ञान विषयाचे क.म.वी. शिक्षक, तदनंतर पर्यवेक्षक व सध्या उपप्राचार्य या पदावर कार्यरत आहेत. त्यांनी महाविद्यालयात विविध समित्यावर अनेक वर्ष कार्य केलेले आहे. सर्वसामान्य कुटुंबातील मुले-मुली शिकली पाहिजेत. या हेतूने दातृत्वाच्या भूमिकेतून अनेक विद्यार्थ्यांना आईच्या स्मरणार्थ अनेक वर्षापासून आर्थिक मदत केलेली आहे, शैक्षणिक क्षेत्रात ज्ञानलालसेपोटी त्यांनी पीएचडी पदवी संपादन करून सेट परीक्षा उत्तीर्ण केली.

बालभारतीच्या अभ्यास मंडळावर ही त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. तसेच त्यांचे पुस्तक राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठफ्नागपूर येथील एम. ए. च्या अभ्यासक्रमास आहे तर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे पदवी अभ्यासक्रमास आहे.या सर्व कार्याची नोंद घेऊन रोटरीने त्यांना शिक्षक गौरव पुरस्कार सन्मानाने गौरीविले आहे. आज महाविद्यालयात येऊन या सर्व समितीच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचा गौरव केला. रोटरी सॅटेलाइट क्लब ऑफ लातूर स्पिरेशनच्या अध्यक्षा डॉ. अर्चना विनोद लड्डा, सचिव सौ .आनंदा कोचेटा, प्रकल्प प्रमुख श्रीमती वनिता लचुरिया, संचालक सौ माधुरी वळसे, डॉ. विनोद लड्डा संचालक. रोटरी क्लब लातूर श्रीमंत कावळे,जकीखान कायमखानी अधिवक्ता जांबुवंतराव सोनकवडे माजी अध्यक्ष रोटरी क्लब लातूर श्री. मोहन परदेशी दिग्दर्शक रोटरी क्लब लातूर, डॉ. उत्तरेश्वर हेरकर संचालक रोटरी क्लब.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड परीक्षा विभाग प्रमुख डॉ.गोपाल बाहेती, स्टाफ सचिव प्रा. सुरेश शिरसागर, समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अंजली जोशी, डॉ. अंजली बनसोडे, प्रा. जिगाजी बुद्रुके, अधीक्षक श्री. संजय व्यास व सहकारी उपस्थित होते.

## भाजपा लातूर व राष्ट्रीय किसान मोर्चाच्यावतीने लातूरात जनसंवाद यात्रा



लातूर / प्रतिनिधी- देशाचे पंतप्रधान व जागतिक नेते मा.ना. नरेंद्रजी मोदी साहेब यांनी गेल्या दहा वर्षामध्ये देशातील सर्वच क्षेत्राचा विकास अत्यंत गतीने करून देशाचा गौरव वाढविण्याचे काम केलेले आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.ना. एकनाथरावजी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी राज्याला अनेक लोकप्रिय योजना दिलेल्या आहेत. या क्रांतीकारी योजनेची माहिती जनसामान्यापर्यंत पोहचविणे व सर्वसामान्य जनतेच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी भाजपा राष्ट्रीय किसान मोर्चा गोवा व गुजरात राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर, भाजपाचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, भाजपाचे लातूर शहर जिल्हाध्यक्ष देविदासराव काळे, युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर व भाजपाच्या ज्येष्ठ सहकाऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये १४ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ९.३० वा गौरीशंकर मंदिर, मार्केट यार्ड, लातूर येथे जनसंवाद पदयात्रेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

या भारतीय जनता पार्टीच्यावतीने आयोजित जनसंवाद यात्रेला भारतीय जनता पार्टीतील अनेक ज्येष्ठ पदाधिकारी व मान्यवर उपस्थित राहणार आहे. तसेच भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष सूर्यकांतराव शेळके, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस शिरीष कुलकर्णी, दिग्विजय काथवटे, प्रविण सावंत, मिनाताई भोसले,बाबासाहेब कोरे, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस निळकंठराव पवार, नितीन कोरे, भालचंद्र दानाई, अजय दुडिले, लातूर महानगरपलिकेचे नगरसेवक बालाजी शेळके, अप्पासाहेब पाटील, सुभाषअप्पा सुलगुडले, जेएसपीएम संस्थेच्या संचालिका आदितीताई अजित पाटील कव्हेकर, भाजपा महिला आघाडीच्या शहर जिल्हाध्यक्ष रागिणीताई यादव, मंडलाध्यक्ष ललीत तोष्णिवाल,संजय गिर, चंद्रकांत खटके, मुन्ना हाश्मी, भाजपा युमाचे शहर जिल्हाध्यक्ष अॅड.गणेश गोमचाळे,जिल्हा सरचिटणीस गजेंद्र बोकण, आकाश बजाज, प्रेम मोहिते,शितल पाटील, सागर घोडके,जिल्हा उपाध्यक्ष विनय जाकते,काकासाहेब चौगुले, संतोष तिवारी, पांडुरंग बोडके, मंदार कुलकर्णी, आकाश जाधव, आदित्य फफागिरे, विश्वजीत पाटील, जिल्हा कोषाध्यक्ष विकास डूरे पाटील,प्रेम मोहिते यांच्यासह मंडळाध्यक्ष, लोकप्रतिनिधी व कार्यकर्ते यांची उपस्थिती राहणार आहे. त्यामुळे या जनसंवाद पदयात्रेत भाजपा कार्यकर्ते, आडते, हमाल, गाडीवान, गुमास्ता, खरेदीदार बांधवांनी मोठ्या संख्येने जनसंवाद यात्रेत सहभागी व्हावे, असे आवाहन लातूर भाजपा व किसान मोर्चाच्यावतीने करण्यात आलेले आहे.

### आत्मबोध १२

दुःखाचे काय कारण ।
अज्ञान आहे आवरण ।
ज्ञान हेच तारण ।
आता आपले ॥ १ ॥

दुःख दूर करूया ।
आनंदी जीवन जगूया ।
त्यासाठी ज्ञान घेऊया ।
आपण सर्व ॥ २ ॥

ज्ञान घेण्यासाठी ।
संतचरणी जावे लागती ।
मग संत दाखवती ।
आनंद मार्ग ॥ ३ ॥

ज्ञानमार्गी जाता ।
आनंद निश्चित मिळतो ।
आता कशास भितो ।
ज्ञानमार्गी ॥ ४ ॥

सिद्धदास, सोलापूर
२७/०१/२०२२

### आत्मबोध १३

निसर्गाची आपत्ती ।
येती आणि जाती ।
आपल्याला का भीती ।
त्याच्यामुळे ॥ १ ॥

आपल्या कर्माप्रमाणे ।
फळ मिळे याची कारणे ।
कर्मावर लक्ष ठेवणे ।
आपला धर्म ॥ २ ॥

पेरेल तेची उगवेल ।
हे कधी का चुकेल ।
काय पेरावे ठरेल ।
आता तरी ॥ ३ ॥

कोणतीही आपत्ती ।
सोडू नये भक्ती ।
हीच खरी युक्ती ।
आनंदाची ॥ ४ ॥

सिद्धदास, सोलापूर
२८/०१/२०२२

## शहरात भाजप युवा मोर्चाचे धरणे आंदोलन



**लातूर / प्रतिनिधी-** भारतीय जनता पक्ष व वारकरी भजनी मंडळाच्यावतीने शहरातील गांधी चौक येथे ज्ञानेश महारावांच्या वक्तव्याच्या निषेधार्थ भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अॅड. गणेश गोमचाळे यांच्या नेतृत्त्वाखाली धरणे, निदर्शने करण्यात आली.

काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष प्रमुख शरद पवार यांच्या उपस्थितीत ज्ञानेश महाराव यांनी आक्षेपार्ह वक्तव्य केले होते. या वक्तव्याचा भाजपच्यावतीने निदर्शने करून निषेध करण्यात आला. या आंदोलनात भाजप युवा मोर्चाचे सरचिटणीस गजेंद्र बोकन, आकाश बजाज, राहुल भुतडा, विनय जाकते, पंकज शिंदे, संतोष तिवारी, बबलू तोष्णीवाल, पांडुरंग बोडके, लखन कावळे, अरुण जाधव, अमित पोद्दार, रमेश लाहोटी, सत्यनारायण वर्मा, बालाजी पिंपळे, आकाश जाधव, बबलू रगडे, आतिश कांबळे आदींसह महिला भजनी मंडळाच्या पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.


## जिल्हा परिषद शिक्षक सहकारी पतसंस्था म.ता. अहमदपूर

४७ वा वार्षिक अहवाल २०२३-२०२४

जा.क्र.३३३ दि. ०२-०९-२०२४

**४७ वी अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस फक्त सभासदांकरिता.**

संस्थच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, जि.प.शिक्षक सह. पतसंस्था म.ता. अहमदपूर जि. लातूर या संस्थेची ४७ वी अधिमंडळाची वार्षिक सर्व साधारण सभा संस्थेचे अध्यक्ष : श्री. व्यंकुराम विश्वनाथ उगिले यांच्या अध्यक्षतेखाली पुढील विषयावर विचार विनीमय करुन निर्णय घेण्यासाठी दि. २२.०९.२०२४ दुपारी १२.०० वाजता संस्कृती मंगल कार्यालय, अहमदपूर येथे बोलवण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

**सभेपुढील विषय :**

१) मागील वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २४.०९.२०२३ चा इति वृतांत वाचून कायम करणे.
२) सन २०२३-२०२४ सालचे वार्षीक अहवाल व दोष दुरुस्ती रिपोर्ट हिशोबपत्रक, नफा तोटा तेरीज, ताळेबंद पत्रक, वाचन व मान्यता देणे बाबत.
३) सन. २०२३ - २०२४ सालाचे ऑडीट अहवाल वाचन व मान्यता देणे.
४) सन. २०२४ - २०२५ सालच्या अंदाज पत्रकास मान्यता देणे व कमी जास्तीच्या खर्चास मंजुरी देणे.
५) सन. २०२४ - २०२५ सालासाठी वैधानिक लेखापरिक्षकाची नियुक्ती करणे.
६) सन. २०२३ - २०२४ च्या नफा वाटपास / विभागनीस मान्यता देणे.
७) उपविधी दुरुस्ती करणे भाग मर्यादा २ लाखाहुन ५ लाख करणे.
८) ठेव व्याज व जिवन हमी विमा रक्कम कमी जास्त पडल्यास चालु नफ्यातुन सदरील (तरतुदीत) रक्कम वर्ग करणे.
९) संस्था सचिव कर्मचाऱ्याऐवजी संचालकातुन करणे (उपविधी दुरुस्ती करणे).
१०) मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने ऐन वेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

**दि. स्थळ : २२.०९.२०२४ रविवार संस्कृती मंगल कार्यालय, महात्मा गांधी कॉलेज समोर, अहमदपूर**

**सभासदांना महत्वाची सुचना :**

१. सभेची आवश्य ती गणपुर्ती न झाल्यास अर्धा तास सभा तहकुब करण्यात येईल व उपस्थितांच्या हजेरीत त्याच ठिकाणी सुचनापत्रातील विषयाच्या विचारासाठी घेतली जाईल. त्यास गणपुर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२. सभेस धोणात्मक विषयावर सुचना करावयाची असेल तर दि.२०.०९.२०२४ पर्यत कार्यालयात लेखी कळवावे. ऐनवेळी आलेल्या सुचना विचारात घेण्यात येणार नाहीत.
मा. संचालक मंडळाच्या अदेशावरुन.

| श्री. गिरीष एम. तोंडारे | श्री. संजय बी. पवार | श्री. सुर्यकांत जी. बोईनवाड |
| --- | --- | --- |
| सचिव | खजीनदार | उपाध्यक्ष |

जिल्हा परिषद शिक्षक सहकारी पतसंस्था म.ता. अहमदपूर

# ग्रामीण तरुणांना नोकरी देण्याबरोबरच उद्योजक व्यावसायिक बनवण्यासाठी अभिनव उपक्रम ट्वेंटीवन शुगर च्या रोजगार मेळाव्यास उस्फुर्त प्रतिसाद

लातूर (प्रतिनिधी):- लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात, शेतकरी आणि शेतमजूर यांच्या मुलांच्या हातांना काम मिळवून देऊन ही कुटुंबे आर्थिक दृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी, मांजरा परिवारातील साखर कारखाने व बँकांनी पुढाकार घ्यावा असा सूचना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी दिल्या असून, या उपक्रमाचाच एक भाग म्हणून १२ सप्टेंबर रोजी ट्वेंटीवन शुगर युनिट १ च्या वतीने आयोजित रोजगार मेळाव्यास तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, या तरुणांना प्रशिक्षणासह, आर्थिक व इतर सर्व प्रकारची मदत करून उद्योजक व व्यावसायिक बनवण्याचा प्रयत्न होणार आहे.

शिक्षण घेऊनही नोकरी मिळत नसल्याने सध्या ग्रामीण भागात सुशिक्षित तरुणांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे, या तरुणांच्या हाताला काम मिळवून देण्यासाठी त्यांना शेतीपूरक उद्योग, व्यवसायात मदत करण्याचा निर्धार मांजरा परिवाराच्या वतीने करण्यात आला आहे, माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या सूचनेवरून १२ सप्टेंबर२०२४ रोजी ट्वेंटीवन शुगर युनिट १ च्या वतीने, कारखाना साईट मळवटी येथे, या तरुणांसाठी रोजगार मेळावा घेण्यात आला, मिळाल्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, हजारोच्या संख्येने या ठिकाणी युवकांनी आपली नोंदणी केली. ग्रामीण भागातील सुशिक्षित तरुणांच्या माध्यमातून शेती व्यवसायात यांत्रिकीकरण आणून हा व्यवसाय फायद्याचा ठरावा हा उद्देस माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांचा असून, त्या दृष्टीने शेती अवजारे,ऊस तोडणी यंत्र तसेच मालवाहतूक करणाऱ्या वाहनांशी संबंधित कंपन्यांचे प्रतिनिधी आणि विविध बँका व फायनान्स कंपन्यांचे प्रतिनिधी या मेळाव्याच्या ठिकाणी उपस्थित ठेवण्यात आले होते, ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रक ट्रॅक्टर, ट्रॉली खरेदी करण्याची तयारी दर्शवणाऱ्या तरुणांनी २५% अनामत रक्कम भरल्या नंतर उर्वरित ७५ टक्के कर्जाची हमी घेण्याची तयारी ट्वेंटीवन शुगर च्या वतीने घेण्यात आली. विविध प्रकारची वाहन चालवणेचे प्रशिक्षण घेतलेले युवक, ऊस तोडणी यंत्रावर काम करण्याची तयारी असलेली युवक, वाहन व इतर मशिनरीची दुरुस्ती करण्याची तयारी असलेल्या युवकांची नोंदणी करून त्यांना रोजगार उपलब्ध करून देण्याचे हमी या ठिकाणी देण्यात आली, शेतीसाठी लागणारी इतर अवजारे खरेदी करून त्याचा व्यवसाय करणाऱ्यांसाठीही, ट्वेंटीवन शुगर व बँकांच्या वतीने हमी देण्याची तयारी यावेळी दर्शवण्यात आली, त्यामुळे या हा रोजगार मेळावा, अनेक तरुणांच्या हाताला तातडीने काम देणारा तर ठरलाच शिवाय अनेक तरुणांना उद्योजक आणि व्यावसायिक बनणारा ठरला आहे, ट्वेंटीवन शुगर युनिट क्रमांक १, मळवटी च्या वतीने आयोजित या रोजगार मेळाव्यास लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, विलास को-ऑपरेटिव बँक तसेच आयसीआयसीआय, एचडीएफसी, सुंदरम, महिंद्रा, एचडीबी, चोलामंडलम, एयुइंडसन, एलअँडटी, व इतर खाजगी फायनान्स कंपन्यांचे प्रतिनिधी, महिंद्रा, स्वराज, हिंदुस्तान, मॅसी, फरगुशन, जॉन डियर ,कुबोटा इत्यादी वाहन कंपन्यांचे प्रतिनिधी त्यांच्या वेगवेगळ्या वाहनांसह या मेळाव्यास उपस्थित होते, शिवशक्ती लक्ष्मण, श्रद्धा, नृसिंह, हिंदुस्तान, लक्ष्मी इत्यादी ट्रॉली व जाळी बनवणाऱ्या कंपन्यांचे प्रतिनिधी ही आपल्या उत्पादन वैशिष्ट्यसह येथे उपस्थित होते,

ज्यांना नोकरी पाहिजे त्यांना नोकरी आणि ज्यांना उद्योग व्यवसायिक बनायचे आहे त्यांच्यासाठी कर्जाची हमी या ठिकाणी देण्याचा प्रयत्न झाला त्यामुळे हा रोजगार मिळावा अत्यंत यशस्वी ठरला आहे.



**काशी विश्वेश्वर मंदिर विशाल नगर लातूर येथे शुक्रवार रोजी सायं ७ वाजता श्री व सौ. सुधीर लातुरे यांच्या हस्ते गणपती बाप्पा ची आरती करण्यात आली. याप्रसंगी प्रा. श्री. मन्मथअप्पा पंचाक्षरी व इतर मान्यवर उपस्थित होते.**

# लातूर शहरातील लाभार्थ्यांनी डीबीटीसाठी कागदपत्रे सादर करण्याचे आवाहन

लातूर / प्रतिनिधी- विशेष सहाय्य योजनेतील राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतील लाभार्थ्यांना शासनामार्फत देण्यात येत असलेला लाभ तात्काळ मिळावा, यासाठी डीबीटी (डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर) द्वारे अर्थसहाय्य वितरीत करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. याकरिता आवश्यक कागदपत्रे लातूर तहसील कार्यालयात सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

विशेष सहाय्य योजनेतील राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतील लाभार्थ्यांची माहिती डीबीटी (डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर) प्रणालीवर भरण्यासाठी या योजनेतील लातूर शहरातील ज्या लाभार्थ्यांनी त्यांचे आधारकार्ड, बँक पासबुक, राशनकार्ड व मोबाईल नंबर याबाबतची माहिती संबंधित बँकेत अथवा लातूर तहसील कार्यालय येथे अद्याप जमा केली नाही, अशा राज्य पुरस्कृत संगायो व श्रावणबाळ योजनेतील लातूर शहरातील लाभार्थी यांनी त्यांचे आधारकार्ड, बँक पासबुक, राशनकार्ड यांच्या छायांकित प्रत व मोबाईल नंबर तीन दिवसात लातूर तहसील कार्यालय लातूर (संगायो लातूर शहर शाखा) येथे जमा करावेत, असे आवाहन तहसीलदार यांच्यावतीने करण्यात येत आहेत.

## पान १ वरून

### राहुल गांधींना...

इशाही यावेळी आ. ठाकरे यांनी दिला. आंदोलनादरम्यान आ. विकास ठाकरे, आ. अभिजित वंजारी, गिरीश पांडव, प्रदेश महासचिव अतुल कोटेचा, उमाकांत अग्नीहोत्री, विशाल मुत्तेमवार, कमलेश समर्थ, संजय महाकाळकर, प्रशांत धवड आदींना पोलिसांनी ताब्यात घेतले.

आंदोलनात अ.भा. काँग्रेस समितीचे सचिव नितीन कुंभलकर, मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे, महिला काँग्रेसच्या अध्यक्ष नंदा पराते, प्रज्ञा बडवाईक, रेखा बाराहाते, रमन पैगवार, आकाश तायवाडे, प्रमोद सिंग ठाकूर, विलास बरडे, राम कळंबे, विवेक निकोसे, रवी गाडगे, श्रीकांत ढोलके यांच्यासह कार्यकर्ते सहभागी झाले.

### अंदमान...

जेलमध्ये वीर सावरकर व अन्य स्वातंत्र्य सैनिकांद्वारे भारत मातेच्या स्वातंत्र्यासाठी केलेल्या संघर्षाची ही भूमी आहे, असेहि अमित शाह यांनी म्हटले.

### अजित पवार...

आहेत. जाणून घ्या इतर कोणते उमेदवार कोणत्या संघातून लढणार याची माहिती.

कोण असतील उमेदवार?

बारामती : अजित पवार, उदगीर : संजय बनसोडे, आंबेगाव : दिलीप वळसे-पाटील, दिंडोरी : नरहरि झिरवळ, येवला : छगन भुजबळ, पुसद : इंद्रनील नाइक, वाई खंडाळा महाबळेश्वर : मकरंद आबा पाटील, पिंपरी : अण्णा बनसोडे, परळी : धनंजय मुंडे, इंदापुर : दत्ता भरणे, रायगड : अदिती तटकरे, कळवण : नितिन पवार, मावळ : सुनील शेळके, अमळनेर : अनिल पाटील, अहेरी : धर्मराव बाबा अत्राम, कागल : हसन मुश्रीफ, खेड : दिलीप मोहिते-पाटील, अहमदनगर : संग्राम जगताप, जुन्नर : अतुल बेनके, वडगाव शेरी : सुनील टिंगरे.

### केजरीवालांना...

निकाल राखीव ठेवला होता. अखेर याप्रकरणी आज सुनावणी झाली. यावेळी अरविंद केजरीवालांना जामीन मंजूर करण्यात आला. अरविंद केजरीवाल यांना १० लाखांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे.

१७७ दिवसानंतर तुरूंगातून बाहेर येणार

अरविंद केजरीवाल हे जवळपास १७७ दिवसानंतर तुरूंगाच्या बाहेर येणार आहेत. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी अरिंवद केजरीवाल यांना काही दिवसांसाठी जामीन देण्यात आला होता. प्रचार झाल्यानंतर त्यांना पुन्हा तरूंगात जावे लागले होते. आता त्यांना रितसर जामीन मिळाला आहे.

जामीन मिळताच शरद पवाराचे ट्टिट

दिल्ली मद्य धोरण गैरव्यवहार प्रकरणात दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना सर्वोच्च न्यायालयाने आज जामीन मंजूर केला. अरविंद केजरीवाल यांना जामीन मिळताच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी 'एक्स'वर पोस्ट केली आहे. शरद पवार यांनी म्हटले आहे की, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना मिळालेल्या जामीनातून एक गोष्ट स्पष्ट झाली की देशात लोकशाहीचा पाया आजही भक्कम आहे. इतक्या दिवसांचा लढा आज सत्याच्या मार्गाने निघाला. अधम मार्गाने एखाद्याला नामोहरम करण्याचा कट लोकशाही बुलंद असणाऱ्या या देशात कधीच यशस्वी होणार नाही, अशी भावना केजरीवाल यांना मिळालेल्या जामीनातून पक्की झाली.

### धारावी...

छुप्या पद्धतीने झाले. कोट्यवधी रुपयांच्या प्रकल्पाच्या भूमिपूजनाचा नारळ फोडताना एवढे घाबरण्याचे कारण काय होते? यामध्ये मोठ्या प्रमाणात घोटाळा होत असून यांच्याकडून जमिनी घेण्याचे काम चालू आहे त्याच्याविरोधात आम्ही आवाज उठवत आहोत. म्हणून घाबरुन त्यांनी भूमिपूजन केले. आमचा त्याला विरोध आहे. लोकांना बरोबर न घेता कुठला विकास होऊ शकतो का? असा सवाल वर्षा गायकवाड यांनी केला.

आता विरोध करणार : गायकवाड

सदर कार्यक्रमाचे कोणालाच निमंत्रण नव्हते. एका खोलीत भूमिपूजन करण्यात आले. पंतप्रधान मोदींचे मित्र आहेत म्हणून त्यांना मोक्याच्या जागा दिल्या जात आहेत. मुख्यमंत्री सांगतात मिठागरांच्या जागांवर कोणतेही बांधकाम होत नाही. पण तिथेच इमारत बांधता येऊ शकते का? हे काम होणार नाही. आमचा विरोध आता तुम्हाला दिसेल असा इशारा वर्षा गायकवाड यांनी दिला.

## जाहीरनामा

मा.जे.सी.गुप्ता, सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.६७३/२०२४

निशाणी क्रमांक:०७

**वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत**

ज्याअर्थी नामे Vyankatrao S/o Narayanrao Dhond, R/o Ghonsi Tq. Jalkot Dist. Latur हे दिनांक २६/०३/२०२४ रोजी Dhondwadi (Ghonsi) Tq. Jalkot dist. Latur मयत झाले आहेत व अर्जदार १. Sushila W/o Vyankatrao Dhond, Age-65 yrs, Occu. H.H., 2. Rajiv S/o Vyankatrao Dhond, Age-49 years, Occu. Agri, 3. Mangesh S/o. Vyankatrao Dhond, Age-46 yrs, Occu. Agri, 4. Satish S/O. Vyankatrao Dhond, Age-43 yrs, Occu. Agri, 5. Umesh S/o. Vyankatgrao Dhond, Age-38 yrs, Occu.H.H., R/o. Dhonwadi (Ghonsi) Tq. Jalkot Dist. Latur

यांनी खालील नमुद ५ व्यक्ती हे मयताचे उत्तराधिकारी असून,

| Sr. No. | Name of Legal Heirs | Age | Relation of Deceased |
|---|---|---|---|
| 1 | Sushila W/o Vyankatrao Dhond | 65 | Wife |
| 2 | Rajiv S/o Vyankatrao Dhond | 49 | Son |
| 3 | Mangesh S/o Vyankatrao Dhond | 46 | Son |
| 4 | Satish S/o Vyankatrao Dhond | 43 | Son |
| 5 | Umesh S/o Vyankatrao Dhond | 38 | Son |

अर्जदार याने Vyankatrao S/o Narayanrao Dhond या मयताचे वार असल्याबाबतचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू **Vyankatrao S/o Narayanrao Dhond** यांचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २२/०८/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीखः ०४/१०/२०२४

**आदेशावरुन**

**(संतोष डी.शिंदे)**
**कनिष्ठ लिपीक,**
**सह दिवाणी न्यायालय**
**क.स्तर, उदगीर**

**(एल.एम.सुत्राळे)**
**सहाय्यक अधिक्षक,**
**सह दिवाणी न्यायालय**
**क.स्तर, उदगीर**

---

तहसील कार्यालय जळकोट (शाखा दंडणीय)
जा.क्र.२०२४/एमएजी/कावि
दि.२३/०८/२०२४

## जाहीरनामा

ज्याअर्थी अर्जदार आगलावे कौशल्या श्रीपती वय ५८ वर्ष रा. धामणगाव ता. जळकोट जि. लातुर यांचा जन्म मौजे धामणगाव ता. जळकोट जि. लातुर येथे अर्जदार यांचे स्वगृही दिनांक ११/०७/१९६६ रोजी झाला असुन जन्म-मृत्यु नोंदवहीला त्याच्या जन्माची नोंद करण्यात आलेली नाही. सदरील आगलावे कौशल्या श्रीपती यांचा जन्म दिनांक ११/०७/१९६६ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी आगलावे कौशल्या श्रीपती यांचा जन्म दिनांक ११/०७/१९६६ रोजी झालेबाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हणणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहु आगलावे कौशल्या श्रीपती यांचा जन्म दिनांक-११/०७/१९६६ रोजीची नोंद ग्रामपंचायत कार्यालय धामणगाव ता. जळकोट जि. लातुर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक २३/०८/२०२४ रोजी दिले
पुढे नेमलेली तारीख २४/०९/२०२४

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार जळकोट**

---

तहसील कार्यालय जळकोट (शाखा दंडणीय)
जा.क्र.२०२४/एमएजी/कावि
दि.२३/०८/२०२४

## जाहीरनामा

ज्याअर्थी अर्जदार पवार मधुकर संग्राम वय ६७ वर्ष रा. पाटोदा बु ता. जळकोट जि. लातुर यांचा जन्म मौजे पाटोदा बु ता.जळकोट जि. लातुर येथे अर्जदार यांचे स्वगृही दिनांक. ११/११/१९५७ रोजी झाला असुन जन्म-मृत्यु नोंदवहीला त्याच्या जन्माची नोंद करण्यात आलेली नाही. सदरील पवार मधुकर संग्राम यांचा जन्म दिनांक ११/११/१९५७ रोजीची नोंद जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी पवार मधुकर संग्राम यांचा जन्म दिनांक ११/११/१९५७ रोजी झालेबाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हणणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहू पवार मधुकर संग्राम यांचा जन्म दिनांक-११/११/१९५७ रोजीची नोंद ग्रामपंचायत कार्यालय पाटोदा बु ता. जळकोट जि. लातुर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक २३/०८/२०२४ रोजी दिले
पुढे नेमलेली तारीख २४/०९/२०२४

**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार जळकोट**


## कल्याण बाजार

| | | |
|---|---|---|
| १४९ | ४-६ | २६८ |
| २३९ | | ७९० |
| ४३-३४ | | ६८-८६ |

## मिलन नाईट बाजार

| | | |
|---|---|---|
| १४० | ५-७ | ११५ |
| २३० | | २२३ |
| ६८-८६ | | ७२-२७ |

गोल्डन विक्री चान्सेस

**प्रो. योगेश कुमार**
स्पेशल जोडी, सिंगल, पत्तीसाठी संपर्क साधावा.
संपर्क 99 93 94 16 69
98 98 20 38 88

## नशिबाची परिक्षा

गोल्डन विक्री चान्सेस

### मिलनम डे

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ७-४ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

### कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ४-० | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ०-७ | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

संपर्क 99 75 47 98 26


## जिल्हा व सत्र न्यायालय, लातूर

**भरती प्रक्रिया सन-२०२४**

**पदाचे नाव - पुस्तक बांधणीकार**

लातूर जिल्हा न्यायालयाच्या आस्थापनेवरील 'पुस्तक बांधणीकार' या पदाकरीता ०१ (एक) उमेदवाराची निवडसूची आणि ०१ (एक) उमेदवाराची प्रतिक्षासूची तयार करण्यासाठी, पात्र उमेदवारांकडून ऑफलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

विस्तृत/सविस्तर जाहिरात विहीत अर्जाच्या नमुन्यासह, जिल्हा व सत्र न्यायालय, लातूर यांचे अधिकृत संकेतस्थळ https://latur.dcourts.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १४/०९/२०२४ रोजीच्या सकाळी ११.०० वाजल्या पासून उपलब्ध राहिल. सदरचा नमुना डाउनलोड करता येईल.

पात्र उमेदवारांनी जाहिरातीमध्ये दिलेल्या नमुन्यातील अर्ज व त्यासोबत कागदपत्रांच्या स्वप्रमाणित प्रत्ती नोंदणीकृत पोच देय डाकेने/पत्रा द्वारे म्हणजेच RPAD किंवा शिघ्र डाक सेवा पोच पावतीसह म्हणजेच Speed Post द्वारे या कार्यालयास म्हणजेच, प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, लातूर या पत्यावर पाठवावेत. तसेच लिफाफ्यावर पुस्तक बांधणीकार या पदासाठी अर्ज असे नमुद करावे. कोणत्याही परिस्थितीत हस्तप्रेक्षणाद्वारे म्हणजेच By Hand अर्ज स्विकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी. अपूर्ण अर्ज नामंजूर करण्यात येतील याचीही नोंद घ्यावी. तसेच मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याचीही नोंद घ्यावी. अर्ज सादर करण्याची अंतीम तारीख २५/०९/२०२४ सायंकाळी ६:०० पर्यंत आहे. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

विस्तृत जाहिरात अर्जाच्या नमुन्यासह जिल्हा व सत्र न्यायालय, लातूर यांच्या https://latur.dcourts.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

जिल्हा न्यायालय, लातूर
दिनांक १३/०९/२०२४

कोर्टाचा शिक्का

**(व्ही. व्ही. पाटील)**
**प्रमुख जिल्हा व सत्र**
**न्यायाधीश, लातूर**

---

## उमेद

## महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, लातूर

E mail-latur@umed.in

जा क्र/एमएसआरएलएम/संपदणूक/३३७/२०२४ दिनांक १३/०९/२०२४

**ई-निविदा जाहिरात प्रथमवेळ मुदतवाढ**

(Tender ID-2024F_MSRLM_1077173_1)

**''सीताफळ प्रक्रिया उद्योगाकरीता यंत्र सामग्री खरेदी करणेबाबत''**

ग्रामीण भागातील दारिद्रय निर्मूलन करण्यासाठी केंद्र शासनाने ग्रामविकास मंत्रालयाच्या माध्यमातून दीन दयाल अंत्योदय योजना (राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान) ची सुरुवात केली आहे. अभियानाच्या अमलबजावणीसाठी राज्यात उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची स्थापना करण्यात आली आहे. या अभियानाची अंमलबजावणी जिल्हास्तरावर जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष व तालुकास्तरावर तालुका अभियान व्यवस्थापन कक्षामार्फत करण्यात येते.

जिल्ह्यातील सावली महिला प्रभागसंघ, मौजे-खरोळा, ता-रेनापूर, जि-लातूर यांचेकरिता नाविन्य पूर्ण उपक्रमांतर्गत 'सीताफळ प्रकिया उद्योगाकरीता यंत्र सामग्री खरेदी' करणेकरीता खुली ई-निविदा (Open E Tender) या संपादणूक प्रणालीद्वारे ई-निविदा मागविण्यात येत आहेत. सादर ई-निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होणेसाठी निविवादाराने https://mahatenders.gov.in वर Online खुली ई-निविदा https://mahatenders.gov.in वर प्रसिद्ध झाल्यानंतर विहित कालावधीमध्ये निविदा सादर करणे पुरवठादारास बंधनकारक राहील. सादर निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक पुरवठादाराकडून निविदा मागविण्यात येत आहेत. ई निविदेच्या आटी व शर्ती तसेच, इतर अनुषंगीक बाबीकरीता https://mahatenders.gov.in व https://zplatur.gov.in संकेतस्थळावर भेट द्यावी.

**स्वाक्षरीत**

**प्रकल्प संचालक, जिग्राविय, तथा**
**जिल्हा अभियान सहसंचालक,**
**एमएसआरएलएम, लातूर**

# यशवंत

शनिवार दि. १४ सप्टेंबर २०२४

# उदगीर

पान ८

कार्यालय :०२३८५-२५३१९८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com





**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**

**शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७**

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)

दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**

वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग


# ‘गणपती बप्पा मोरया’ या गजरात श्री चे शांततेत विसर्जन

## मानाचा आजोबा गणपती चे रात्री ७.४५ विसर्जन तर शेवटचा गणपती १ वाजता :-५५ गणेश मंडळे मिरवणुकीत सहभागी

## उदगीर शहरात सात दिवसाच्या गणपतीचे विसर्जन शुक्रवार दिनांक १३ सप्टेंबर रोजी शांततेत पार पडले





**दैनिक यशवंत उदगीर विभागिय कार्यालयात क्रिडा व युवक कल्याण मंत्री ना.संजय बनसोडे यांच्या हस्ते श्री ची आरती करण्यात आली यावेळी राम मोतीपवळे यांनी ना.संजय बनसोडे यांचे स्वागत केले.या प्रसंगी यावेळी बामणी गावचे वृक्ष मित्र राजकुमार बिरादार बामणीकर ,रोहित मोतीपवळे उपस्थित होते.**

उदगीर / प्रतिनिधी- युवक संघ गणेश मंडळ पारकट्टी गल्ली मानाच्या आजोबा गणपतीचे रात्री सात वाजून ४५ मिनिटाला विसर्जन झाले उदगीर शहरात मानाचा आजोबा गणपती चे राज्याचे क्रीडा व युवकल्याण मंत्री ना. संजय बनसोडे यांच्या हस्ते पूजा व आरती करून करण्यात आले यावेळी उदयगिरी गणेश महामंडळाचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष राजेश्र्वर निटुरे, अतिरिक्त पोलिस अधिक्षक अजय देवरे, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सुंदर बोंदर ,चंदन पाटिल नागराळकर,अजिम दायमी, अमोल निडवदे, पोलिस निरिक्षक अभिषेक शिंदे,दिलिप मजगे, गणेश मंडळाचे अध्यक्ष डॉ. रवी मुळे, बबलू मुळे, महेश झुंगास्वामी सुरेश कुरुपखेळगे,गूरु धनशेट्टे,प्रा.अडेप्पा अंजूरे,ॲड सचीन हुडगे,भरत करेप्पा,प्रशांत हुडगे, व मंडळाचे पदाधिकारी आदी उपस्थित होते बारा वाजता मिरवणुकीने आर्य समाज येथे तर तिन वाजता चौबारा येथे ना.संजय बनसोडे , जिल्हाधिकारी वर्षा ठाकुर घुगे, पोलीस अधीक्षक सोमय मुंढे माजी नगराध्यक्षा राजेश्र्वर निटुरे, कार्याध्यक्ष ॲड गुलाब पटवारी यांच्या हस्ते आरती करुन सार्वजनिक गणेश मिरवणुकीस प्रारंभ झाला .सायंकाळी ६.३० वाजता कै.अशोक पुदाले चौक येथे आगमन झाले तर रात्री ठिक ७.४५ वा.तळवेश येथील सार्वजनिक विहरीवर विसर्जन झाले.

नगरपरिषदेने उभारलेल्या स्वागत व्यासपीठावर ना.संजय बनसोडे, उपविभागिय अधिकारी सुशांत शिंदे, उदयगिरी गणेश महामंडळाचे अध्यक्ष राजेश्र्वर निटुरे,मुख्याधिकारी सुंदर बोंदर अतिरिक्त पोलिस अधिक्षक अजय दोरवे, शिवकुमार हसरगुंडे, संग्राम हुडगे हणमंत औरादे,नायबतहसिलदिर राजश्री भोसले,अतिरिक्त पोलिस निरिक्षक लक्ष्मण डोईजोडे, उदयगिरी गणेश महामंडळाचे कार्याध्यक्ष ॲड गुलाब पटवारी यांनी स्वागत केले. ढोलताशाच्या गजरात गणरायाला निरोप देण्यात आला. कॉर्नरचौक येथे माजी खा.सुधाकर श्रंगारे यांनी स्वागत व्यासपीठ उभारले होते यावेळी गणेश भक्तांचे स्वागत करण्यात आले तर ईंजि.विश्र्वजित गायकवाड फाऊंडूशनच्यावतीने स्वागत मंटं उभारण्यात आला होता.याठिकाणी विश्र्वजित कदम, नागेश अष्टुरे,प्रविण अंबुलगेकर भुषण घुगे, अशिष हुरदळे,अक्षर जेवळीकर यांनी स्वागत केले.पत्तेवार चौक येथे भाजपा महायुतीच्यावतीने स्वागत व्यासपीठ उभारण्यात आलू होते याठिकाणी माजी जि.प.अध्यक्ष राहुल केंद्रे,माजी न.प.उपाध्यक्ष सुधिरभाऊ भोसले, विजयकुमार निटुरे ,उत्तराताई कलबुर्गे, शहराध्यक्ष मनोज पुदाले,ॲड दत्ता पाटिल,दिलिप मजगे यांच्या सह महायुतीचू पदाधिकारी उपस्थित होते तर महाविकास आघाडीच्यावतीने उभारण्यात आलेल्या स्वागत मटपात माजी आ.सुधाकर भालेराव, चंदन पाटिल नागराळकर,ॲड पदमाकर उगीले, अजीम दायमी,गजानन सताळकर यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. गणेश विसर्जन शांततेत पार पाडण्यासाठी पोलिस अधिक्षक सोमय मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय अधिकारी, शहर पोलिस स्टूशनचू पोलिस निरिक्षक अभिषेक शिंदे, ग्रामिणचू पोलिस निरिक्षक राजकुमार पुजारी यांनी चौख बंदोबस्त ठेवला होता.





**सांब महाजन राजकुमार मजगे व शिवराज पाटिल शिरुर ताजबंद यांनी दैनिक यशवंत उदगीर विभागिय कार्यालयास सदिषा भेट दिली यावेळी तुझा विसरन व्हावा ग्रंथ भेट देऊन स्वागत करण्यात आले यावेळी पर्यिवरण प्रेमी राजकुमार बिरादार बामणीकर, राम मोतीपवळे,रोहित मोतीपवळे**



**लातूर जिल्ह्याच्या कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी मा.सौ.वर्षा घुगे ठाकूर यांनी श्री अमोल निडवदे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली, यावेळी उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे, अमोल अनकल्ले, पवन चव्हाण, सागर बिरादार, गुरू पांढरे,प्रसाद नाईकवाडे उपस्थित होते.**



**महापूर / येथील वसंत नगर परिसरातील नागरिक बंधू- भगिनिंशी संवाद साधून अडीअडचणी जाणून घेतल्या. त्यांचा जनसंपर्क आणि कार्यकर्त्यांची मोठी फळी आहे. बालाजी राठोड यांच्या निवासस्थानी डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी त्यांच्या कुटुंबातील सदस्यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी गोरोबा भांदर्गे, शहाजी राठोड, प्रकाश आडे, बाबुराव पवार, तात्यासाहेब राठोड, संजय आडे, लालू राठोड, सूरज आडे,अनिल जाधव, मणिक अलुरे, वल्लभ वावरे, संगीत रंदाले, विनायक राठोड व यावेळी परिसरातील नागरिकांचीही मोठी उपस्थिती होती. अनेकांनी आपल्या अपेक्षा बोलून दाखविल्या.**

# एस.टी. ड्रायव्हरची मनुष्य वधाच्या आरोपातून निर्दोष मुक्तता

धाराशिव दि.१२ (प्रतिनिधी) - मोटर सायकल ला बसची धडक लागून झालेल्या अपघातात मोटारसायकल स्वराचा मृत्यू झाला. या प्रकरणी संबंधित एस टी बस चालकाच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, सरकार पक्षाच्यावतीने न्यायालयात आलेला पुरावा, त्यातील विसंगती आणि तपासात झालेल्या त्रुटी आरोपी बस चालकाचे विधीज्ञ निलेश दत्तात्रय बारखडे यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्या. तसेच चालक हे कसे निर्दोष आहेत याचा युक्तिवाद व्यवस्थितरित्या केला. त्यामुळे ऍड बारखडे यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून व सबळ पुराव्या अभावी मुख्य दंडाधिकारी पी.ए. सवडीकर यांनी आरोपी ड्रायव्हरची दि.६ सप्टेंबर रोजी निर्दोष मुक्तता केली.

याबाबत अधिक माहिती अशी की, दि. १६ मार्च २०१७ रोजी संध्याकाळी ५.४५ वाजण्याच्या सुमारास औरंगाबाद (छ. संभाजीनगर), उस्मानाबाद (धाराशिव) रस्त्यावर दत्ता कुलकर्णी यांच्या पेट्रोल पंपासमोर भाऊसाहेब भगवान देशमुश व त्यांच्या पत्नी अनिता देशमुख (रा.पोहनेर) हे मोटर सायकलवरून चालले होते. यावेळी समोरील येणाऱ्या एसटी बसचा चालक शिवाजी लहाडे यांनी निष्काळजीपणाने भरधाव वेगाने बस चालवून देशमुख यांच्या मोटारसायकलला जोराची धडक दिली. त्या धडकेत तो मोटारसायकल चालक भाऊसाहेब देशमुख यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी आनंदनगर पोलीस ठाण्यात रावसाहेब देशमुख यांनी तक्रार दिली. त्यानुसार एस.टी चालक शिवाजी लहाडे याच्या विरूध्द गुन्हा कलम २७९, ३३७, ३३८ भा.द.वि आणि कलम १३४,१८४ एम.वि ऍक्ट नुसार आनंद नगर पोलीस स्टेशनने गुन्हा दाखल केला. या गुन्ह्याचा तपास बाबुराव चव्हाण यानी करून आरोपी विरूध्द मे. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले. या प्रकरणी सरकारी पक्षाच्यावतीने न्यायालयात साक्षीदार म्हणून मयताचा भाऊ, पत्नी, भाचा, पेट्रोल पंपावर काम करणारे कर्मचारी व गुन्ह्याचा तपास करणारे तपासिक अंमलदार असे एकूण ७ साक्षीदारांच्या साक्ष नोंदविण्यात आल्या. सरकार पक्षाच्यावतीने न्यायालयात आलेला पुरावा, त्यातील विसंगती आणि तपासात झालेल्या त्रुटी ऍड बारखडे यांनी न्यायालयासमोर मांडल्या. ऍड बारखडे यांनी केलेला युक्तीवाद ग्राह्य धरून आरोपी ड्रायव्हर लहाडेची मुख्य दंडाधिकारी पी.ए. सवडीकर यांनी सबळ पुराव्या अभावी निर्दोष मुक्तता केली. आरोपी तर्फे ऍड बारखडे यांनी काम पाहिले. त्यांना ऑड. ए.एस. पाटील, ऍड. डी.एस. मडके यांनी सहकार्य केले.






# आळंद येथे सिद्धलिंग स्वामी पालखी महोत्सव



देवणी: यंदाही हिरेमठ संस्थान आळंद, येथील मठामध्ये लिंगैक्य सिद्धलिंग महास्वामीजी यांच्या पुण्यामरणानिमित्त पालखी व यात्रा महोत्सव होणार आहे. शनिवारी सकाळी १० ते दुपारी तीनपर्यंत मोफत आरोग्य तपासणी शिबिर होणार आहे.

शिबिराकरिता आळंद येथील समता आयुर्वेदिक महाविद्यालय यांचा सहभाग राहणार आहे. रविवारी १० वाजता मठातून पालश्री महोत्सव आळंद शहराच्या प्रमुख मार्गावरून काढण्यात येणार आहे. त्यानंतर ११ वाजता भ.ज. १०८ सिद्धेश्र्वर शिवाचार्य महाराज, आळंद यांचे पाद्यपूजा, तसेच भक्तगणांकडून महाराजांना किरीट समर्पण व महाराजांचे तुलाभार कार्यक्रम होणार आहे. दुपारी १२ वाजता आशीर्वाचन व १ वाजता महाप्रसाद कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन विश्वस्त समिती श्रीसिद्धरिंग महास्वामीजी, हिरेमठ संस्थान आळंद यांनी केले आहे.